

# श्री साईलीला

नेवारी कि. ५० पैसे १९७१

## या अंकांत—

१ साधुसंतांची संघटना
२ पंढ्रिमलाईचे सत्पुरुष
३ महायोगी शुद्धानंदभारती
४ श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर ( कांहीं आठवणी )
५ त्रैमूर्ति दंडधारी
६ तीन या संख्येचा प्रभाव
७ ईश्वरसाक्षित्वाच्या खुणा
८ स्वामी विवेकानंदांचें एक मार्गदर्शक पत्र
९ महर्षि धुंडिराज विनोद
१० संतांचा प्रसाद
११ श्रीसाईनाथस्तोत्र
१२ त्या भगवन्मूर्ति आहेत



# श्री साईवाक्सुधा

स्वतःला महापंडित व विद्वान समजून कांहीं लोक स्वतःच्याच बाबतीत अन्याय करीत असतात. खोट्या अभिमानानें ते उगाच फुगून तट्ट होत असतात. त्यांना भक्तिमार्गाचें आकलन झालेलें नसतें. अशांच्या सहवासांत सहसा मुळींच येऊं नये. अभिमान मग तो कोणत्याही स्वरूपाचा असो. तो नाश करणारा आहे. त्याच्या किंवा ज्यांच्याठायीं त्याचा आढळ दिसून येईल त्यापासून नेहमीं चार पावले दूर रहावें.

—श्रीसाईसच्चरित

---


श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक. ]

वर्ष ४९ वें ] जानेवारी १९७१ [ अंक १० वा

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

**टे. नं. ४४३३६१**

: कार्यालय :

**साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ,**
**प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४**

# साधुसंतांची संघटना

**प्रिय वाचक:--**

आध्यात्मिक बाबतीत आपला भारत हा एक अनन्यसाधारण देश आहे. हजारो वर्षापासून या देशांतील निरनिराळ्या भागांत साधुसंत जन्माला आले व लोककल्याणाचे कार्य करून गेले. ती परंपरा आजही अव्याहत चालू आहे. तिला खंड पडलेला नाहीं, कारण ही भूमि देवाची आवडती भूमि आहे. जनतेनें नीतिधर्माची कास धरून व ईश्वरप्राप्ति हें आपले ध्येय मानून त्या मार्गानें जीनवभर वाटचाल करावी. नेहमीं सत्कृत्यांत व इतरेजनांचें भलें करण्यांत काल कंठावा ही आमच्या साधुसंतांची शिकवण आहे व तिचा वारसा परंपरेने चालू आहे.

साधुसंत म्हटले म्हणजे ईश्वर चिंतनांत सतत मग्न राहून जे कोणी आपल्या सन्निध येतील त्यांच्या कल्याणासाठीं झटणारे. हें त्यांचे कार्य कांहीं कमी महत्त्वाचें नाहीं. परंतु आज जमाना बदललेला आहे. अनेक कारणामुळें माणसांची श्रद्धा वेगळ्या बाजूला वळूं लागली आहे. जीवन संग्राम दिवसें-दिवस खडतर होत चालला आहे. त्यापायी देव आणि धर्म यांचा साहजिकच विसर पडण्याचा हा काळ आहे.

अशा यां काळांत लोककल्याण हें ज्यानी आपलें कर्तव्य मानिलें त्यानाही आपल्या जीवनकार्यांत कालानुरूप बदल करणें अत्यावश्यक वाटूं लागलें आहे. एकेका साधुसंतापेक्षां असे अनेक साधुसंत एकत्र आले व एकमेकांच्या सहकाराने लोककल्याणाचें कार्य करूं लागले तर त्यामुळें मानवजातीचा व अखिल राष्ट्राचा कितीतरी पटीनें फायदा होणार आहे. सामुदायिक कार्याचें महत्त्व व त्याचे इष्ट परिणाम शब्दांनीं वर्णन करून सांगता येणार नाहींत; हें ओळखून आपल्या देशांतील साधुसंतांनीं एकत्र येऊन व आपली सुसंघटना बनवून मिळेल त्या वेळांत लोककल्याणाचें कार्य करण्याचें ठरविले तर ते अधिक फलदायक व अधिक परिणामकारक होणार आहे, हें उघडच आहे.

हे जाणून आपल्या देशांतील साधुसंतांनी एकत्र येऊन व संघटित होऊन देशकल्याणाच्या दृष्टीनें कार्यरत होण्याचें गेल्या कांही वर्षांपासून ठरविले आहे व त्याप्रमाणे त्यांची पावलें पडू लागलीं आहेत ही आत्यंतिक समाधानाची व आनंदाची गोष्ट आहे.

सुमारे दोन अडीच महिन्यापूर्वी मुंबईत एक साधु परिषद भरली होती व आपला नित्याचा एकांतवास सोडून बरेच साधुसंत या परिषेदस हजर राहिले होते.

मानवसेवा हीच खरी देवसेवा होय. ती सेवा म्हणजेच प्रार्थना. आजच्या काळांतील हा महामंत्र आहे. या महामंत्राचा जप जसा प्रत्येक मानवाने करणें इष्ट आहे त्याचप्रमाणें आमच्या वंदनीय साधुसंतांनीही या मंत्राला आपल्या जीवनांत प्राधान्य देणें जरूर आहे व आनंदाची गोष्ट म्हणजे या मंत्राची महती त्यांना सांगण्याची मुळीच जरूरी नाही. जाहीर रीतीनें त्या मंत्राचें आचरण होणेंच जरूर होतें व तें आतां होण्याच्या मार्गास लागलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

नवनवे शास्त्रीय शोध जगभर लागत आहेत. मानव चंद्रापर्यंत जाऊन पोहोंचला आहे व आणखी तो कुठवर जाऊन पोहोंचेल हें आज कोणालाही सांगतां येणार नाहीं. अशा या परिस्थितीत मानव गोंधळून गेला नाहीं तरच नवल. आज सर्व जगभर गोंधळ माजलेला आहे. आपला भारतही त्या गोंधळांत साहजिकच सामील झाला आहे. अशा परिस्थितींत मानव देवधर्मापासून व नीतिधर्मापासून दूर फेकला जाणार नाहीं, तो देवाला व नीतिधर्माला चिकटून राहील, देवावरील निष्ठेला व आपल्या बधुंभावाच्या कर्तव्याला तो चिकटून राहील, त्याबाबतीत रात्रंदिवस जागरूक राहील याकडे लक्ष पुरविणे व त्या कार्याला वाहून घेणें हें आजच्या काळांतील आमच्या साधुसंतांचें कर्तव्य आहे व त्याची जाणीव या एकत्र येण्यामुळें सर्वांना झाली आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

—संपादक

# पंद्रिमलाईचे सत्पुरुष

## स्वामीजींचा विशेष परिचय

अनुवादक—**श्री. आप्पाराव**

**गेल्या जून महिन्याच्या (१९७०) साईलीलेतून एका सत्पुरुषाचा परिचय या मथळ्याखाली पंद्रिमलाईचे स्वामीजी यांचा अल्प परिचय करून देण्यांत आला होता. वाचकांची जिज्ञासा लक्षांत घेऊन त्यांचा उपलब्ध झालेला अधिक परिचय येथे करून देण्यात येत आहे.**

श्रीरामस्वामी किंवा त्यांच्या जन्मस्थानावरून जे श्रीपंद्रिमलाई स्वामी या नावानें ओळखले जातात त्यांच्या जीवनकार्याचा व वेळोवेळीं त्यानीं केलेल्या अभूतपूर्ण चमत्कारांचा अल्पपरिचय यापूर्वीच आमच्या वाचकांस करून देण्यांत आला आहे. त्यांच्या जीवनकार्याचा जितका म्हणून परिचय करून घ्यावा तेवढा थोडाच होईल व आमच्याकडे आलेल्या अनेक वाचकांच्या पत्रांवरून त्यांच्या चालू कार्यासंबंधाने त्यांना उत्सुकता वाटत आहे असें दिसून येते. वाचकांची जिज्ञासा तृप्त व्हावी या हेतूनें त्यांचे एक भक्त व चहाते त्याचप्रमाणे आजच्या काळांतील एक थोर योगी, महर्षि शुद्धानंद भारती यानीं स्वतःला आलेल्या त्यांच्या संबंधीच्या विविध अनुभवांचा जो परिचय करून दिला आहे तोच वाचकांपुढे अत्यादरपूर्वक ठेवण्यात येत आहे.

श्रीभारती स्वामी म्हणतात, माझ्या दीर्घकालीन आयुष्यांत आजवर अनेक योगी व सिद्ध पुरुष यांना भेटून पुण्यपावन होणाचा सुयोग सुदैवानें जुळून आला आहे. पंद्रिमलाईचे सत्पुरुष श्रीरामस्वामी यांची कीर्ति मी फार

दिवसांपासून ऐकत होतो; परंतु त्यांच्या प्रत्यक्ष भेटीचा योग मात्र जुळून आला नव्हता. तो आला मी मलाया भागांत फिरत असतां.

मलायामधून मला कांहीं परिचित मंडळीचें आमंत्रण आल्यावरून मी तिकडे गेलों होतों. आणि त्याच सुमारास पंद्रिमल स्वामीजीनीं त्या भागांत भक्तांच्या विनंतीवरून दौरा काढला होता. त्यावेळी त्या राज्याचे एक मंत्री नामदार संबंधम् यांच्याकडे त्यांचा मुक्काम होता. त्या मंत्रिमहाशयांस पुत्रसंतान कितीतरी वर्षांपासून नव्हते. स्वामीजींच्या कृपेने त्याना जें हवें होतें तें एकदाचें मिळालें.

या स्वामीजीना जगांत अशक्य असें कांहींच नाहीं. वाटेल तो चमत्कार सिद्धिबळावर ते करून दाखवूं शकतात. ज्यांचा ईश्वरावर विश्वास नाहीं असे एक गृहस्थ त्यांच्याकडे आले आणि म्हणाले, "काय हो स्वामीजी! एखादी जीवंत वस्तू बसल्या बैठकींत तुम्हीं काढून दाखवूं शकाल?"

स्वामीजीनी ताबडतोब आपले दोन्ही हात क्षणभरच मिटून धरले आणि हात उघडतांच त्या हातांत कुहू कुहू करणारी एक कोकिळा नाचत असलेली आढळून आली.

तुम्हीं त्यांच्याकडे पहाल तर ते तुम्हांला सर्वसाधारण माणसासारखे दिसतील. दाढी वाढविलेली नाहीं, अंगावर भगवी वस्त्रें नाहींत, कांहीं नाहीं. ते आदर्श गृहस्थाश्रमी आहेत. संसार सोडून न जातां प्रत्येकानें संसारांत राहून आदर्श रीतीने आपलें जीवन घालवावें व सर्वांकडून धन्य धन्य म्हणवून घ्यावें, अशी आहे त्यांची महत्त्वाची शिकवण. आपल्या दैनंदिन वागण्याने तोच आदर्श त्यांनीं सर्वांपुढें ठेविला आहे.

त्यांचें दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद मिळवावे या हेतूने मी त्यांच्या भेटीस गेलों असतां त्यानीं माझें स्वागत कशा रीतीने केलें तें सांगू का? त्यानीं माझे दोन्हीं हात आपल्या हातांत घेऊन माझ्या हातांत एक सुन्दर फूल ठेविले आणि ते बंद केले. मी हात उघडून पहातों तर काय? मी ज्या मदुरेच्या मीनाक्षी देवीचें भजन पूजन करतों तिला नेहमीं लावण्यात येणारें लालभडक कुंकू! माझे दोन्हीं हात त्या पवित्र कुंकुमानें भरून गेले होते.

दुसऱ्या दिवशीं मी त्यांच्या भेटीस गेलो. त्यावेळींही त्यानीं माझे दोन्हीं हात आपल्या हातांत घेऊन, ते बंद केले. मी उघडून पहातो तर काय? माझे दोन्हीं हात सुगंधी उदीनें भरून गेलेले होते! ती उदी अजूनही मी जवळ बाळगली आहे व तिचा सुगंध अजूनही कायम आहे!

एकदां मी त्यांच्या गावीं त्यांचा सहवास घडावा या हेतूनें गेलों असता आपल्या कांहीं भक्तांबरोबर ते मला तिरुपतीच्या यात्रेला घेऊन गेले. आम्हीं तेथील देवी पद्मावतीच्या मंदिरांत उभे होतो. इतक्यात स्वामीजी खाली वाकले आणि आपल्या हातानें तेथील पवित्र जमिनीस त्यांनी स्पर्श केला; आणि तोच हात त्यांनी माझ्या दोन्ही हातात छट्ट धरला व क्षणार्धांत हळूच बाहेर ओढून घेतला. माझे दोन्हीं हात बारीक सुवासिक तांदळांनीं व डाळींनीं भरून गेले होते.

त्यानंतर श्रीव्यंकटेश्वराच्या दर्शनाला आम्ही तिरुमलाई टेकडीवर गेलो. तेथे पूजाअर्चा आटोपल्यानंतर आम्ही बाहेरच्या पटांगणांत आलो. त्याचवेळी आंध्रचे मुख्यमंत्री तेथें दर्शनासाठीं आले होते. त्यांचे हात स्वामीजीनी आपल्या हातांत घेऊन ते चोळतांच त्यांचे हात प्रसादाने भरून गेले. त्यांत काय होतें? त्यांत काजूगर, मनुका, खडीसाखर वगैरे जिन्नस होते. शिवाय त्यांत चंदन व मंत्राक्षताही होत्या.

कधीं कधीं आम्हीं बोलत बसलों असतां माझे हात आपल्या हातांत घेऊन ते द्राक्षें, मनुका व खडीसाखर यानीं भरून टाकीत असत व तो प्रसाद मला खायला सांगत असत. त्यांचा तुम्हांला स्पर्श होतांच अननुभूत सुगंधाने तुम्हीं दरवळून जाल व त्यांच्या तोंडांतून जे शब्द बाहेर पडतील ते खरे ठरतील! केवढें आहे त्यांचे हें सामर्थ्य!

मला त्यांच्याकडून कांहींना कांही ज्ञानोपदेश घ्यायचा होता. तशी योग्य संधी मिळतांच मी त्यांच्याजवळ माझी इच्छा प्रकट केली. त्यानीं काय करावे?

जवळच असलेल्या एका भक्ताच्या खांद्यावरील उपरणें त्यांनीं ओढून घेतलें व तें जमिनीवर पसरताच मधोमध एक नारळ आढळून आला! नंतर स्वामी-जीनीं मला एका हातांत कागद व दुसऱ्या हातांत लिहिण्याचे पेन धरायला सांगितले. कांही क्षण लोटले असतील. स्वामीजी म्हणाले "तुमच्या हातांतील

ती कोऱ्या कागदाची घडी उघडा पाहूं ? आणि पहातों तों काय ? त्यांत गणेशमंत्र लिहिलेला होता. त्या मंत्राचे पठन भक्तिभावपूर्वक मी करूं लागलों व नटराजाला ओंजळीनें फुलें वहात होतों. इतक्यांत त्या फुलांत विघ्नेश्वर गणरायाची एक सुंदर मूर्ती आढळून आली. आजही ती माझ्या देव्हाऱ्यांत असून तिची पूजा रोज नित्यनेमानें होत असते.

मला नंतर समजलें कीं त्रावणकोर येथील एक कार्यकर्ते श्री. के. के. वर्मा यानांही स्वामीजींनीं विघ्नेश्वराची एक स्फटिकाची सुंदर मूर्ती बहाल केली असून ती हातांत घट्ट धरली असतां ती श्वासोच्छ्वास करीत असते.

स्वामीजी बोलतात फार कमी. करतात मात्र अपरंपार. त्यांच्याठायी अहंकाराचा लवलेशही नाहीं. भक्तांच्या कल्याणासाठीं व त्यांना भक्तिमार्गाकडे वळविण्यासाठीं ते नाना चमत्कार करून दाखवितात.

मी श्रीशंकराच्या त्रिशूलाची नेहमीं पूजा करतो. एकदां मी शंकर व त्यांचा त्रिशूल याबद्दल स्वामीजींशी बोलत बसलो होतो. तो चांदीचा बनविलेला असून त्याच्यावर कांही चिन्हे कोरलेली आहेत. तो त्रिशूल त्यावेळी माझ्याजवळ नव्हता. परंतु सहज बोलतां बोलतां मी त्यांना त्याची माहिती करून देत होतो.

स्वामीजी म्हणाले– ठीक आहे. आपण प्रत्यक्षच पाहूं या त्याला ! आणि आम्ही सर्व भक्तमंडळी तेथे बसलो असतां त्यांनी शंकराची प्रार्थना केली. व तो त्रिशूल कृपया येथे हजर करा अशी प्रार्थना केली. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो त्रिशूल हवेतून उडत उडत त्यांच्या हाती येऊन थांबला. त्याला चंदनाचा व कुंकुमाचा लेप केलेला होता. तो त्रिशूल नंतर स्वामीजीनीं आशीर्वादपूर्वक माझ्या हातीं दिला; त्या दिवसापासून मी कुठेहीं जाऊं लागलो तरी तो माझ्या सोबतीला असतो. त्यामुळे कुठेही जाण्याची मला भीति वाटत नाहीं.

भगवान मुरुगा हें स्वामीजींचें दैवत. आपल्या भक्तिभावाने त्या दैवताला त्यांनीं संपूर्णपणें वश करून घेतले आहे. जेव्हां जेव्हा जरूर भासते त्या त्या वेळी त्या दैवताची ते आराधना करतात व त्यांची मागणी पूर्ण करतात. मग ती मागणी कोणत्याही स्वरूपाची असो. भगवान बालमुरुगा यांच्या पदकमलांचे दर्शन घडावें असें एकदां मला तीव्रतेने वाटूं लागले. माझी

इच्छा जाणून स्वामीजी आपल्या बैठकीच्या खोलींतून बाहेरच्या सभागृहांत आले. त्यावेळीं तिथें दुसरे कोणीही नव्हते. त्यांनीं तेथें जमिनीवर एक शुभ्र कागद पसरून ठेवायला सांगितलें. नंतर स्वामीजीनीं आपल्या गोड आवाजांत प्रार्थनापर असें एक पद आळविले. व शेवटीं आपल्या पदकमलांचें दर्शन घडवा अशी विनवणी केली. चांदीच्या घुंगुरुचा आवाज आमच्या कानांत पडला, कांहीं क्षण लोटल्यानंतर जमिनीवर पसरलेला कागद स्वामीजींच्या हातीं जाऊन तेथें स्थिरावला. तो उघडून पाहतां त्याच्यावर बालमुरुगाचीं सुंदर पावलें उमटलेली होती.

स्वामीजींचा हात एकदां हातांत घेऊन मी पाहिला. त्याच्यावर शंख, चक्र, झेंडा, त्रिशूल वगैरे चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. तशींच चिन्हें पायांवरही आढळून आलीं. त्याच्या खांद्याच्या दोन्हीं बाजूस शंख व चक्र ही चिन्हें दिसतात. 'ॐ नमः शिवाय' हा महामंत्र त्याच्या मुखी सदैव असतो. स्वामीजींची सहधर्मचारिणी म्हणजे प्रत्यक्ष देवताच होतो. ती एक आदर्श पत्नी होती. गृहकृत्यांत ती अत्यंत दक्ष होतीच; परंतु आध्यात्मिक क्षेत्रांतही स्वामीजींना त्या देवतेनें संपूर्ण सहकार दिला. तिलाही अनेक सिद्धि प्राप्त झाल्या होत्या. आपल्या पूज्य पतीपूर्वी ती भगवंताच्या चरणाजवळ निघून गेली. स्वामीजींच्या शिष्यांनीं तिच्या अस्थि निरनिराळ्या ठिकाणच्या पवित्र तीर्थांत टाकण्यासाठीं भक्तिभावानें नेल्या. कांही भक्त नाशीक येथें गोदावरीच्या तिरी गेले असता तेथें अस्थींच्या ऐवजी त्यांच्या हातीं लालभडक कुंकू आढळून आलें. तसाच प्रकार इतरत्र घडून आला.

प्रत्येकानें मनोभावें देवभक्ति करावी व भगवंताचें दर्शन घ्यावें यासाठीं त्यांचा अहर्निश व परोपरीने प्रचार चालू असतो. जें जें आपले भक्त मागतील तें तें आपल्या सिद्ध हस्तांनी ते देत असतात. देवाला विसरू नका. त्याच्या आराधनेंत कांहीं क्षण घालवा. त्यामुळें तुम्हीं सुखी व्हाल. हें भक्तांना त्यांचें नेहमी सांगणें असतें.

स्वामीजीनीं मंत्रसामर्थ्याने अनेकांस व्याधिमुक्त केले आहे. ज्यांना दृष्टि नव्हती त्यांना दृष्टिलाभ करून दिला. जे जन्मजात मुके होते त्यांना त्यांनीं बोलके केलें आहे. त्याचप्रमाणे जे बहिरे होते त्यांना ऐकू येण्याचें सौख्य प्राप्त करून दिले आहे.

आजच्या काळांतील अशा या थोर विभूतीचा प्रत्येकानें फायदा करून घेतला पाहिजे व आपलें जीवन सुखी व सुसंपन्न बनविलें पाहिजे, असें मला नेहमीं वाटतें.

# महायोगी शुद्धानंदभारती जीवनकार्याचा अल्प परिचय

लेखक—श्री. आप्पाराव

या अंकांत ज्यांच्या लेखाच्या सहाय्यानें पंद्रिमलाई येथील स्वामीजींचा परिचय करू देण्यात आला त्या लेखाचे मूळ लेखक मद्रास येथील शुद्धानंद भारती हे एक थोर योगी आहेत. अड्यार येथे त्यांचा योगाश्रम आहे. अनेक थोर राजकारणी पुढाऱ्यांच्या व सत्पुरुषांच्या सहवासांत ते आले आहेत. आध्यात्मिक दृष्ट्या त्याची योग्यता फार मोठी आहे. त्यांचे वडील हे एक नावाजलेले योगी पुरुष होते. त्यांच्यामुळें शुद्धानंदांना गीतेकडे वळावे असें वाटलें. लहानपणापासून त्यांचें देवधर्माकडे लक्ष असे. त्यांनीं पैशांची पर्वा कधी केली नाही. आपण भगवंताच्या कृपेला पात्र झाले पाहिजे हेंच त्यांचें ध्येय होते व त्यासाठीं त्यांची अहर्निश धडपड चालू असे.

तुमची इच्छा प्रबल असावी लागते. मग तुम्हांला आपोआप मार्ग सांपडत जातो. त्या मार्गांत असता जरूर ते वाटाडेही भेटत जातात. शुद्धानंदाचे तसेंच झालें. त्यांना प्रकाशांत वावरायचें होतें. आपणास अधिकाधिक प्रकाशाचा लाभ व्हावा, आपण ईश्वरी तेजाच्या दिव्य प्रकाशांत न्हाऊन धुवून निघावें, असें त्यांना वाटत असे.

## बुद्धिमान् विद्यार्थी

त्यांचें विद्यार्थीजीवन संस्मरणीय होतें. शिकण्याची हौस दांडगी स्मरणशक्तीचा भरपूर सहकार. मग काय विचारतां ? इंग्रजी, फ्रेंच, संस्कृत, हिंदी तेलगू वगैरे विविध भाषांत त्यानीं हां हां म्हणतां प्रभुत्व मिळविलें.

शुद्धानंदांना अनेक सुंदर व श्रीमंतांच्या मुली सांगून आल्या परंतु त्यानी हेतूपूर्वक त्यांच्याकडे व त्याबरोबर संसाराकडेही पाठ फिरविली. त्यांना लग्नाचा योग साधायचा नव्हता तर भगवंताशीं योग साधावयाचा होता.

शुद्धानंद हे थोर कवी आहेत तसेच गायकही आहेत. एका हायस्कूलमध्यें ते शास्त्रीय ( सायन्स ) विषयाचे अध्यापक होते. तेथें ठीक चालले होते, परंतु एकदा महात्मा गांधींजींची भेट झाली आणि ते शुद्धानंदजींच्या काव्याने भारले गेले. दोघेही एकमेकांकडे खेचले गेले. महात्माजींच्या सहवासांत रहातां यावे म्हणून त्यानी चांगल्या पगाराच्या नोकरीवर लाथ मारली.

## शिरडीचे साईबाबा

लो. बाळ गंगाधर टिळक यांचा व भारतींचा दाट स्नेहसंबंध होता. १९१६ साली या दोघांची लखनौत भेट झाली. त्यावेळी लोकमान्यानी त्याना गीताग्रंथ भेटीदाखल व आठवणीदाखल दिला. तो ग्रंथ त्यांची आठवण म्हणून सतत आपल्याबरोबर बाळगण्याचे धोरण त्यानीं स्वीकारले आहे. असे समजते की लो. टिळक व शुद्धानंदभारती हे दोघेही एकाच वेळी शिरडी येथील श्रीसाईबाबांच्या दर्शनास गेले होते. साईबाबानी शुद्धानंदजीना भावी काळांतील त्यांच्या कार्यक्रमाची त्याना मांडणी करून दिली. उभयतांनीं त्याचा आशीर्वाद मिळविला.

डॉ. ॲनी बेझंट ह्या शुद्धानंदजीवर बेहद्द खूष झाल्या होत्या. मिल्टन कवीचे सर्व ग्रंथ त्यानी त्याना अर्पण केले व त्यानी ते अभ्यासिले. त्याचा त्याना फार उपयोग झाला. त्यामुळें त्यांची काव्यप्रतिभा जोराने फोफावली. शुद्धानंदजीना सत्पुरूष सहवासाची जीवनभर आत्यंतिक ओढ लागून राहिलेली असे. त्यामुळे श्री रमण महर्षी, योगेश्वर श्रीअरविंद, लो. टिळक, महात्मागांधी, कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर या सर्वांच्या सहवासांत ते आले आहेत. हिमालयांत फिरत असतां अचानक त्यांची व एका महायोग्याची भेट झाली.

त्यांच्याकडून त्यानीं जरूर असलेल्या योगविद्येचा वारसा मिळविला व पुढें त्यांत पूर्णत्व संपादन केले. त्यानंतर सुमारें पंचवीस वर्षें ते एकांतात व जगाच्या कोलाहलापासून दूर होते. त्यांना सिद्धि प्राप्त करून घ्यायची होती.

शुद्धानंदजीनीं केवळ भारताचाच नव्हे तर जगाचा प्रवास तीन वेळा केला. ते भारतातील थोर पुरुषांच्या सान्निध्यांत आले. एवढेच नव्हे तर रोमा रोलां, बर्नार्ड शा, बर्ट्रांड रसेल यांच्यासारख्या जगप्रसिद्ध विद्वानांच्या सहवासांतही आले आहेत. त्यांनी इंग्रजीप्रमाणें फ्रेंच भाषेंतही विपुल काव्यरचना केली आहे. सोव्हिएट लँडनें त्यांच्या काव्यावर बेहद्द खूष होऊन त्यांना भव्य पारितोषिक अर्पण केलें व त्याच्या बळावर त्यांनीं स्वतःचे ग्रंथ छापून काढण्यासाठीं एक छापखाना उभा केला.

शुद्धानंदजी सतत लिहीत असतात. सर्व धर्मीयांनीं एकमेकांशी बंधु-भावानें व प्रेमानें वागावें. परमेश्वर एकमेव आहे. त्याची आपण सर्व लेकरें आहोंत. हाच त्यांच्या लेखातील मुख्य सूर असतो. टागोर, गांधीजी व योगी अरविंद यांचे ते कट्टे अनुयायी आहेत. त्यांचेच जीवनकार्य ते आपल्या परीनें पुढे चालवीत आहेत. त्यांचे कांहीं ग्रंथ जगभर ख्याती पावले आहेत

# श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर

## आणखी कांहीं अनुभव

**लेखिकाः—** सौ. इंदिरा श्रीधर नाईक.

माझें लग्नकार्य थाटामाटांत झालें; परंतु बारावर्षें होऊन गेलीं तरी मूलबाळ नव्हतें, त्यामुळें आम्ही दुःखी कष्टी होतों. देवावर भरिभार ठेऊन आम्हीं दिवस कंठीत होतो. एके दिवशी माझ्या मावशीबाई सौ. सुशीलाबाई पिंगे यांची भेट झाली असतां हा प्रश्न निघाला. त्या आपले पती श्री. धोंडनाथ पिंगे यांच्यासह मधून मधून प्रभादेवी येथील एक सत्पुरुष श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर यांच्या दर्शनास जात असत. या महाराजांवर त्यांची श्रद्धा बसली होती. त्यांनीं आम्हांला या सत्पुरुषाची जरूर भेट घ्या, असें आग्रहपूर्वक सुचविले.

त्यांच्या सूचनेप्रमाणें आम्ही उभयतांनी श्रीजांभेकर महाराजांच्या दर्शनास जाण्याचें ठरविले. पहिल्याच भेटीत आनंद वाटला आम्हाला. नंतर मधून मधून आम्हीं भेटीस जाऊं लागलो. आम्ही कांहीं मागणें केले नाहीं. उत्तरोत्तर आमच्या मनांतील भक्तिभाव वाढत चालला.

एके दिवशीं महाराज म्हणाले, " तुम्हीं उभयतां येथेंच माझ्याजवळ कांहीं दिवस रहायला या. येथें तुमची सर्व प्रकारची सोय होईल. कसली चिंता करूं नका.

महाराजांचें आश्वासन विचारांत घेण्यासारखें होतें. त्यांचा आदेश मोडतां येण्यासारखा नव्हता. तेथें रोज सकाळपासून सायंकाळपर्यंत शेंकडो माणसें येत असत व प्रसाद म्हणून भोजन करून समाधान वृत्तीनें जात असत. तेथें जाणाऱ्याचें मन रमत असे. मनावर भक्तिभावाचा ठसा उमटत असे. महाराज एका बंद खोलींत एकांतांत रहात असले तरी मधून मधून बाहेर

येऊन भेटीस येणाऱ्यांची विचारपूस करीत असत. प्रत्येकाच्या अडीअडचणी समजून घेऊन कांहीं ना कांहीं उपाययोजना सांगत असत.

महाराजांच्या आदेशांत कांहीं तरी हेतू असावा असें वाटून आम्हीं प्रभादेवीवरील त्यांच्या निवासस्थानीं अर्थात् त्याच्या मठांत उभयतां अगदीं निःसंकोचपणे येऊन राहिलो. तेथे आमचा मुक्काम ३।४ महिने होता. इतके दिवस रहाण्याचे कारण त्यांच्याकडून घरीं जाण्याची आज्ञा आम्हाला मिळेना.

तेथें असलेल्या मुदतींत मला एकदां दोषी तापाने ( टॉयफाईड ) गांठले. ती एक दुर्दैवी घटना होती. तो ताप धोका देणारा त्याचप्रमाणे फार जपण्यासारखा. त्या स्थितींत तेथे न करता घरी जाणे व चांगल्या डॉक्टरांच्या सल्यानुसार वागणे अत्यंत जरूर आहे असे आम्हांला व तेथे येणाऱ्या आमच्या नातलगांस वाटूं लागले. हे सर्व लक्षांत घेऊन महाराजापाशी आम्ही घरीं जाण्याची परवानगी मागितली. डॉक्टरांचा सल्ला घ्यायला सर्व नातलग मंडळी सांगताहेत, असेंही जाणविलें.

त्यावर महाराज म्हणाले, "येथें डॉक्टर बिक्टर कोणाचीही जरूरी नांहीं. मी येथें तुमची काळजी वहाणारा असतांना दुसऱ्या कोणाचीही जरूरी नाहीं तुम्ही येथें निर्धास्त रहा."

महाराजानीं एवढें आश्वासन दिल्यानंतर तेथून जाण्याची जरूरी नाही, असे आम्हीं ठरविले.

त्या दिवसांत महाराज सर्वप्रकारें माझी काळजी स्वतः जातीनें घेत असत. मला तहान लागली असतां तीर्थ व बाजरीचें पाणी आपल्या हातांनीं देत असत. महाराज मधून मधून माझ्याजवळ येऊन बसायचे. माझ्या पाठीवरून हात फिरवायचे व मुळीच घाबरू नकोस असें प्रेमळपणें मला सांगायचें त्यामुळें मला व माझ्या नातलगास धीर वाटत असे.

त्या तापांतून बरोबर बेचाळीस दिवसांनीं माझी सुटका झाली. मला मागाहून समजले कीं, माझ्यासाठीं महाराजांनीं कडक उपवासाचें व्रत स्वीकारले होतें.

मी आजारांतून उठलें आणि वाटलें कीं आतां तरी घरीं जाण्याची परवानगी मिळते कां पहावे, व त्याप्रमाणें भीत भीत त्यांना विचारले.

छे! छे! इतक्यांत जायचं नाहीं, आजोबांची ( आजोबा म्हणजे अक्कल

कोटचे स्वामी महाराज ) परवानगी अजून मिळालेली नाहीं आणि ती मिळाल्या-शिवाय तुम्हीं येथून जाऊ शकत नाहीं.

एके दिवशीं महाराज मला म्हणाले, " तुम्हांला जाण्याची परवानगी मिळाली आहे. आतां वाटेल तेव्हां जायला हरकत नाहीं. "

ही परवानगी मिळाल्याचें समजताच आम्ही जाण्याची तयारी केली. जातांना नमस्कारपूर्वक त्याचा निरोप घ्यायला गेलों तेव्हां माझ्या हातीं अक्कलकोटस्वामी महाराजांची तसबीर देऊन श्रीजांभेकर महाराज म्हणाले, " यांची आठवण नेहमीं करीत जा. रोज नित्यनेमानें त्यांची पूजाअर्चा करीत जा. कधीं काळीं तुझ्यावर संकट आलें तर यांची प्रार्थना कर, त्यांची करुणा भाक त्यामुळें तूं संकटमुक्त होशील आणि तुझें कल्याण होईल. "

स्वामी महाराजांच्या तसबिरीशिवाय त्यानीं मला एक समई व फिरकीचा तांब्या भेठीदाखल दिला.

त्यानंतर १९४२ सालीं मला मुलगा झाला व त्याच्या पाठीवर एक मुलगी झाली. दोघेही सुखांत व आनंदांत आहेत. ही महाराजांचीच कृपा असें आम्हीं समजतों.

आम्हीं महाराजांजवळ ३।४ महिने होतों म्हणून सांगितलें. त्यामुदतीत त्यांनीं भक्तिभावाशिबाय आमच्याकडून पैशाआडक्यांची किंवा कशाचीही अपेक्षा केली नाहीं.

त्यांच्या मठांत रोज शेकडो लोक येत व भोजन करून जात. सकाळ पासून रात्रीपर्यंत सर्व कारभार शांतपणें व सुरळितपणें चालत असें.

त्यानंतर कांहीं वर्षांनीं आम्हीं दादर येथील जागा सोडून गिरगांवात रहायला गेलो. बिऱ्हाड बदलण्याची पाळी आली म्हणजे सामानाचा बोजा शक्य तेवढा कमी करण्याच्या हेतूने माझे यजमान जरूर नसलेले सामान जवळच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस देऊन टाकायचे. मला त्यांच्या पुढे बोलण्याची छाती नसे. ते करतील ते प्रमाण आणि अजूनही तसंच.

आमच्या जुन्या घरांत भिंतीवर लावलेल्या देवादिकांच्या कांही तसबिरी होत्या. त्यातच श्रीजांभेकर महाराजानी दिलेली अक्कलकोट स्वामींची तसबीर होती. तिच्यासकट यजमानांनी सर्व तसबिरी शेजाऱ्यास देऊन टाकल्या.

माझ्या मनाला मोठी चुटपूट लागून राहिली; परंतु मला बोलण्याची मात्र छाती झाली नाही.

आम्ही नव्या जागेंत रहायला आलो आणि पहिल्याच दिवशीं मला तापाने गाठलें. त्या रात्री मला एक स्वप्न पडले. स्वप्नांत एक वृद्ध गृहस्थ आले आणि ते माझे पाय घासू लागले! मी मनांत चरकले आणि जें कांहीं समजायचें ते समजून चुकलें.

दुसऱ्या दिवशीं माझे वडील नवीन जागा पहायला व आम्हाला भेटायला आले. मी तापामुळें बिछान्यावर पडलेली! वडिलांस जवळ बोलावून मी म्हणाले, "कसेंही करून आजच्या आज दादरवर आमच्या जुन्या बिऱ्हाडीं जा आणि शेजारच्या बिऱ्हाडकरूकडे फ्रेमी देण्यांत आल्या आहेत. त्यांतील फक्त अक्कलकोटस्वामी महाराजांची तसबीर घेऊन या."

त्याप्रमाणें माझ्या वडिलानीं जाऊन ती तसबीर आणून माझ्या स्वाधीन केली. मी तिची पूजाअर्चा सुरू केली. माझा ताप कुठच्या कुठे पळाला.

पंधरा वर्षांपूर्वी मीं नित्यनेमाने दर गुरुवारी उपवास करीत असें. कांहीं ना काहीं कारणामुळें तो बंद पडला! त्याचा परिणाम काय झाला? आमच्या घरांत आजाराने प्रवेश केला. घरांत कोणी ना कोणी आजारी असायचा.

एके रात्रीं माझ्या स्वप्नांत अक्कलकोटचे स्वामी महाराज आले. आमच्या स्वयंपाक घरांतील पाटावर बसले आणि मला उद्देशून म्हणाले, "गुरुवारीं उपवास करण्याचा नियम तूं कां बरं मोडलास? यापुढें तो उपवास न चुकतां करीत जा!"

त्या आठवड्यापासून मी गुरुवारचा उपवास करू लागलें. आणि त्याचा परिणाम म्हणजे आमच्या घरांतील आजार हद्दपार झाला! त्यापूर्वीं दर वर्षी कोणी ना कोणी भयंकर आजारी पडून इस्पितळांत जाईपर्यंत पाळी यायची.

श्रीरामकृष्ण महाराज बहुतेक वेळ मठांतील आपल्या एका बंद खोलींत रहात असत. त्यांचा चेहरा नेहमीं हंसरा असे. अंगांत मलमलचा पांढरा सदरा, नेसायला लुंगी, कधी कधीं केसांचा अंबाडा घातलेला असे. कधीं मस्तक उघडें तर कधीं डोकीला फडका गुंडाळलेला असे. त्यांच्या पड-

चींत एक शेळी बांधलेली असे. तिच्यावर त्यांचें भारी प्रेम होतें. तिच्या खाण्यापिण्याकडे ते जातीनें लक्ष पुरवीत असत.

महाराजांच्या बाबतींत एक गोष्ट माझ्या मनाला अतिशय लागून राहिली आहे. ते कांहीं दिवस आजारी स्थितींत काळ कंठीत होते. त्या स्थितींत असतां त्यानीं एकदां मला भेटून जा असा निरोप पाठविला. परंतु कांहीं ना काहीं अडचणीमुळें मी त्यांच्या भेटीस जाऊं शकलें नाहीं ! मी किती दुर्दैवी !

त्यानंतर त्यानीं समाधि घेतल्याचें दुःखद वृत्त माझ्या कानीं आलें ! ती बातमी ऐकून माझ्या मनाला मोठा धक्का बसला !

ते कधी कधीं माझ्या स्वप्नांत येतात. एकदां ते स्वप्नांत आले असतां मी धीर करून विचारलें, "महाराज ! इतके दिवस आपण होतां कुठें ?"

"मी होतों तेथेंच आहे. पण तुला माझी आठवण कुठे आहे ? आठवण केलीस तेव्हां आलों ! " महाराज म्हणाले.

आणखी एक अनुभव सांगून संपवितें. एकदां माझे यजमान आपल्या नोकरीवर जाण्यासाठीं बाहेर पडले. त्यावेळीं बसनें जाण्यासाठीं त्यानीं बस पकडली परंतु चढतां चढतां हात सुटून ते खालीं पडले. पडण्यापूर्वीं ते फरफटत गेले. त्यांना बरेंच लागलें, परंतु हाड वगैरे कांहीं न मोडतां त्या अपघातांतून ते बचावले ! घरीं आले आणि मला म्हणाले "तुझं नशीब शिकंदर म्हणूनच एका दुर्धर अपघातांतून मी बचावलों !"

आणि आदल्याच दिवशीं मला एक स्वप्न पडलें होतें. माझ्या स्वप्नांत एक म्हातारे गृहस्थ (आजोबा) आले आणि म्हणाले, "मुली ! हें बघ ! तुझ्या यजमानांचें आयुष्य मी वाढवीत आहे !"

वरील प्रमाणें या स्वप्नाचा पडताळा मला ताबडतोब आला.

सौ. इंदिरा श्रीधर नाईक.
(गोखले रोड दक्षिण)
सर्वोदय ट्रस्ट बिल्डिंग
पहिला मजला, खो. नं ४१.

# त्रैमूर्ति दंडधारी

( **लेखकः—** केशवसुत सच्चिदानंद दाणी. )

सत्व, रज आणि तम त्रिगुणांकित त्रिमुखी सहा हातांच्या एक देहाच्या मूर्तीला माझा नमस्कार असो. सतां सिद्धिःसत्वे भवति महतां नोपकरणे। खरेपणा, चांगुलपणा, सिद्धियुक्तविशुद्धता, विद्यमान जोः—

मालाकमण्डलुधरः करपद्मयुग्मे
मध्यस्तपाणियुगुले डमरुत्रिशूले ॥
यस्तस्य ऊर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे ।
वन्दे तमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम् ॥

सर्वप्रथम दर्शनीय, शोभायमान दोन्ही हातात जपमाला, कमण्डलु आहेत. मधल्या दोन्ही हातांत डमरू, त्रिशूळाची जोडी आहे. आणि अशाच तऱ्हेने शिरोभागापर्यन्त उंचवर केलेल्या परमपवित्र दोन्ही हातांनी, मंगलमय शंख, तिरोभाव दर्शविणारे, आणि अशुभ वातावरण नष्ट करणारे, कर्दनकाळ चक्र धरलेले आहे. सहा हातात असले हे अलंकार असलेल्या सत्यव्रत विष्णुदेवा, आशिर्वाद देणाऱ्या हे प्रभो, तुला माझा त्रिवार प्रणिपात असो.

मुखे तीन परंतु शरीर एक ह्याचाही अर्थ हाच कीं, मूळ त्रिगुणांतून हे सारे जग निर्माण झाले आहे. या सर्वांची विचारणा दत्ताची त्रिमुखी मूर्ति करीत आहे. अशी ही मूर्ति त्रिमुखी असली तरी दत्ताची एकमुखी मूर्ति इष्टकार्याच्या सिद्धीला उपकारक रूपाने संत साम्राज्यांत तेजत आहे. एकमुखी किंवा त्रिमुखीं काय कोणतीही दत्तमूर्ति साधकांना प्रत्यक्षपणे जे व्हावयाचे ते मात्र एकाच परात्पर शक्तीचें होय. यांत तिळमात्र शंका नाहीं. विशेषतः योगमार्गांतील दत्तोपासना ही एक मुगी दत्ताचीच रूढ आहे. दत्त ही देवतास्वरूप शक्ति आहे. आणि म्हणूनच ती तीन-मुखानी प्रकट होऊं शकते.

मूर्तिकल्पनेचे इतके सुंदर, वास्तविक आणि प्रमाणगम्य जागतिक तत्त्वज्ञान इतर ग्रंथात आढळणार नाही. दीर्घकालीन योगधोरणानुसार विशेष-ज्ञान शद्बरूप पावले असल्यानें आजवर ते अबाधित राहिले आहे. अदृश्य परमेश्वराच्या सामर्थ्याचे साक्षात दिसणारे स्वरूप, अग्नि, वायु, धरित्री, समुद्र, आकाश, नद्या इत्यादि पुष्कळ प्रकारच्या रूपांनी आपणास दिसते. हे सर्व दिसणारे पदार्थ म्हणजे त्या अस्पष्ट, अव्यक्त सत्य ज्या जोगे साक्षात् इंद्रियगोचर होते ती मूर्ति अशी मूर्ति या शब्दाची मूळ उत्पत्ति आहे. अग्नी ही त्या निराकार परमात्म्याची साकार मूर्तीच आहे. मूर्ती अव्यक्त परमेश्वरी शक्तीच्या परमांणूनी जेव्हा अणुप्रणीत होतात, तेव्हांच त्यांना कार्यकारित्व प्राप्त असतें. म्हणूनच उपनिषदकारांनी म्हटले आहे.

अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टा रूप रूप प्रतिरूपो बभूव ।

एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा रूप रूप प्रतिरूपो बहिश्च ॥ एखाद्या पूजनीय व्यक्तीबद्दल आपण जो आदरभाव दाखवितो ती खरी मूर्तिपूजाच आहे. सर्वत्र नामरूपानी चकाकणाऱ्या या जगात दिसणाऱ्या आकाराची आपण पूजा करीत असलो. तरी ती पूजा-मात्र आकाराधिष्ठीत परमात्मशक्तीचीच होते. एखाद्या प्रतिमेला आपण सुगंधी सुमनांचा हार घालतो, तो केवळ प्रतिमेलाच उद्देशून नसतो. तर तो ज्याची प्रतिमा असते त्याला उद्देशून असतो. ह्या जगात तीन आद्यशक्त्या वावरत असतात. ब्रह्मा ही सृजन करणारी म्हणून उत्पत्तिशक्ती, विष्णू ही सृष्टपदार्थांचे संरक्षण करणारी म्हणून स्थितिशक्ती, महेश ही आपल्या मूळ अव्यक्त कारणात घेऊन जाणारी प्रलय शक्ती. प्रमथनाथ शक्तीचे खरे नाव संहार शक्ती नव्हेतर कोणता ही सजीव वा निर्जीव पदार्थ नाश पावत नाही. तर तो फक्त अव्यक्तांत जातो व नाहीसा होतो. वर सांगितलेल्या विविध शक्ती याच नामरूपांनी वेळोवेळी प्रकट होतात. ब्रह्मा, विष्णु, महेश हे वास्तविक. जगाच्या उत्पत्ति, स्थिति, लय अशा अनुक्रमे तीन अवस्था दर्शक देव-अव्यक्त अशा परब्रह्माचीच व्यक्त किंवा सगुण रूपें होत. या तीन देवांना सुद्धा खरे अस्तित्व नसून अव्यक्त परब्रह्मावर अनुसंधान लागावे म्हणूनच त्यांच्या मूर्तीची कल्पना करण्यांत आली आहे. या तिन्ही देवांचा तसे पाहा-वयास गेलें तर परब्रह्माच्या उपासनेच्या सोईसाठींच जन्म झाला असल्याने त्यांचा

जन्म देखील जगातील इतर चराचर वस्तूप्रमाणेंच मायेच्या पोटीं झाला असे म्हटले आहे. मायेच्या पोटी परब्रह्माने हे तीन देव मायेने निर्माण केले. ब्रह्मा विष्णु व महेश हे तीन देव परब्रह्माचीच तीं व्यक्त स्वरूपे असल्यामुळें व तीं मायेने निर्माण झालीं असल्याने त्यांना परब्रम्हाची मुलें असें संबोधण्यात आले आहे. या तीन देवांचा परब्रह्म हा पिता व माया ही आई अशी ही एकंदरीत कल्पना आहे. या तिन्ही देवाना प्रत्येकीं स्वरूप व आकार देऊन ब्रह्मदेवाने त्यांना मूर्त स्वरूपांत मूर्तिमंत केलें. त्या तीन देवांच्या अस्तित्वाला परब्रह्म जसें जबाबदर आहे, तसा त्याच्या विविध लीलानांही त्याचाच आधार आहे. परब्रह्म स्वतः निराकार आहे पण मायेने त्यानेच निर्माण केलेले तीन देव मात्र साकार करून मूर्त स्वरूपात आणले. ब्रह्मा, विष्णु व महेश यांची सगुणोपासना हा अव्यक्तोपासनेचा सुकर व सोपा मार्ग आहे. त्या प्रमाणेंच भक्ताला सगुणोपासनेनें हळूहळू परब्रह्माकडे अनुसंधान लागून अव्यक्त अशा परब्रह्मोपासनेत मुरविले जाते. अशा ह्या त्रिविधशक्ति आपल्या मूळस्थानापासून विश्वधारणेसाठीं त्या खाली येतात म्हणून त्यांचे अवतरण झाले असे मानण्यांत येतें. अशी अवतीर्ण झालेली शक्ती पात्रतेनुसार आधाराने ज्या वेळी जीवकोटीत सगुणरूप धारण करते त्या वेळीं त्या जीवधारी व्यक्तीला सर्व श्रेष्ट परमोच्च परमेश्वरी शक्तीला आपण विभूती असें मानतों.

उगमापासून सागरापर्यन्त गंगा जरी तीच असली तरी विविध स्थानांच्या संपर्कामुळें एकविध गंगेला विविध नांवें प्राप्त होतात. हीं नानाविध नांवें जशी गंगेचा सागराशी त्रिवेणी संगम झाल्यावर सागररूपांत विलीन होऊन जातात, तद्वत अनेकविध मार्गांनी प्रकट होणारी ही मूळ परमेश्वरी शक्ती ज्या वेळी दत्तरूपांत अवतीर्ण होते, त्या समयीं होणारा हा त्रिवेणी संगम त्रैलोक्याचा अंधकार नाहींसा करण्यास समर्थ होतो. त्या वैशिष्टयामुळें दत्तावताराला जसें चिरंजीवित्व प्राप्त झाले आहे, तसेंच त्रिविध शक्तीचा समन्वय या अवतारांत झाला असल्यामुळें या तीन शक्तींची प्रतीक रूपेंच जणू अशी तीन मुखे असणारी दत्ताची लोकहितैषी लोकातीत, लोकोत्तर, लोकाभिराम, मनोभिराम, मनोज्ञ, मंगलमूर्ति उपासकांच्या ह्रदयावकाशात कायमची प्रतिष्टीत होऊन राहिली आहे.

दत्तावतारासंबंधीं अनेक संतांनी जें काय सांगितलें तें साधनेच्या महाद्वारातून तपोमंदिरांत प्रवेश केल्यावर सांगितले. या सर्वांचा विचार या ठिकाणीं जागेअभावी अप्रस्तुत आहे. तथापि या बाबतीत या संत पुरुषांचे तसेंच जागृतिहनुमान मंडळाचें जनता जनार्दन हनुमान विभूती श्रीबाळ यतीना श्रद्धेय प्रणिपात करून त्यांच्या मार्गें वाटचाल केली तर आज ना उद्यां आपल्याला अगदी जवळ जाऊन पोहोंचण्याचा दाट संभव वाटतो.

संतानी सर्वगुणसंपन्न तेजोमय अखंड जगदोद्धारक, सत्यसत्य सात्त्विक, शुचिर्भूत सुस्मरणीय सुयश, तेजोराशी, सुकोमल, सत्यकाम, विष्णु-अवतार दत्ताला, सद्गुरूस्वरूप, चिदानंद, नित्यानंद सच्चिदानंद मानलें आहे.

आपण, या श्रीदत्ताकडे सविनय भावें पाहूं यां.

---

# तीन या संख्येचा प्रभाव !

( लेखक : **शाहीर खाडिलकर** एम्. ए. बी. टी. )

सकाळीं आठ नऊच्या सुमारास स्नान वगैरे आटोपून हातांत श्रीमद्भगवद्गीता घेतली होती. आणि नित्याप्रमाणे पंधरावा अध्याय वाचण्यास सुरवात करणार होतो. इतक्यांत शेजारच्या घरांतून कांहीं शब्द कानावर पडले. ' तीन तीन वेळां मी हें सांगितलं होतं पण त्याचा कांही उपयोग झाला नाही ! ऐकलं नाहीं ना ! मग आतां ती गोष्ट कदापीहि होणार नाहीं हें त्रिवार सत्य ! ”

माझ्या विचारशक्तीला धक्का देण्यासाठींच तो दिवस उगवला होता कीं काय कुणाला ठाऊक ! जग हें रोजच दिसत असते. गीतासुद्धां रोज वाचत असतों. तसेंच इतर धर्मग्रंथ रामायण, महाभारत वगैरे मधून मधून चाळीत असतो. इतिहासही चाळत असतो. पण त्या दिवशीं त्या शेजारच्या घरांतून हे जे शब्द ऐकू आले त्यानीं माझ्या मनांत मोठी खळबळ उडवून दिली ! ' तीन

तीन वेळा ' ' त्रिवार ' हेच ते शद्ध ! या शद्धांतून तीन या संख्येचाच उपयोग कां करण्यांत आला ? चार कां नाहीं, पांच कां नाहीं, एक कां नाहीं ! मन प्रज्वलित झालें आणि विचार करूं लागलों.

### तीन या संख्येचा प्रभाव

तीन या संख्येचा प्रभाव कोठें कोठें पडला आहे ते पाहात चाललों तेव्हां तीन या संख्येच्या सामर्थ्याची जाणीव होऊं लागली. **इजा बिजा तिजा !** लॉटरींत दोन वेळां पैसे मिळाले ना ! आतां तिसऱ्यांदा ते मिळणारच असा विश्वास बळावत जातो ! एखादी गोष्ट तीन वेळां होणे याला फार महत्त्व आहे. मग तें तीनदां होणें चांगलें असेल किंवा वाईट असेल. संकटें दोन वेळां आलीं कीं तें आणखी एकदा येणारच, असें आपणास वाटू लागतें.

तीन या संख्येने हजारों वर्षांचा काळ व्यापून टाकला आहे आणि या संख्येच्या सामर्थ्याला अजून हीनत्व आलेलें नाहीं ! वैदिक, पौराणिक, ऐतिहासिक काळांत किंवा विद्यमान काळांतहि तीन या संख्येने सर्वत्र आपले ठसे उमटविलेले दिसत आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या वाङमयांत **तीन** ही संख्या सतत प्रभाव पाडीत आली आहे. घरगुती संभाषणे व व्यवहार, तसेच धार्मिक, राजकीय व सामाजिक अशा सर्व बाबतींत आपणास हेंच दिसून येत आहे. आतां काहीं उदाहरणें, तपासू या. **कठोपनिष-दांतील** संदर्भ.

नचिकेता यमराजाच्या घरीं यमलोकीं गेला. पण यमराज **तीन** दिवस घरीं नव्हते. घरीं कोणीच नसावे ! म्हणून तो **तीन** रात्री घराबाहेरच्या कट्टयावर बसून राहिला. परत आल्यावर यमराज प्रसन्न झाले आणि त्याला **तीन वर** दिले. वेदांतशास्त्रांत ' **तत् त्वम् असि** ' हें **तीन** पदांचें महावाक्य सुप्रसिद्धच आहे. ' तें ब्रह्मतत्त्व तूंच आहेस ' असा याचा अर्थ आहे. **उत्पत्ति, स्थिति आणि लय** — विश्वाच्या या **तीन** अवस्था सर्वांच्या परिचयाच्याच आहेत. वर्तमान, भूत व भविष्य हे **तीन** काळ कुणाला ठाऊक नाहींत ? यावरूनच आपण **त्रिकालाबाधित** सत्य असें म्हणत असतो.

कौमार्य, यौवन आणि जरा, या **तीन** अवस्थाच शरीराला व्यापून असतात. महाभारतांतही **तीन** या संख्येने असेच वर्चस्व गाजविलेले आहे. यमराजाला प्रसन्न करून घेण्यासाठीं सावित्रीने तीन रात्रीचे व्रत केले. ( व्रतं तिरात-

मुद्दिश्य दिवा रात्र स्थिताऽभवत्० ) सावित्री यमराजाच्या पाठोपाठ **तीन् पावलेंच** गेली तेव्हां प्रसन्न होऊन यमराजांनी सत्यवानाचे प्राण परत दिले.

**ब्रह्मा, विष्णु आणि महेश** या **तीन** देवतारूपानीच परब्रह्म सगुण स्वरूपांत प्रगट झालें. तीन शिरें असलेल्या श्रीदत्तात्रयांना आपण अत्यंत पूज्य समजतो.

पुरुष हा एकजिनसी असून प्रकृति त्रिगुणात्मक आहे. ते **तीन** गुण म्हणजे सत्त्व, रज आणि तम. प्रकृतीच्या या त्रिविध प्रकारामुळेंच श्रद्धा, आहार, यज्ञ, तप, दान ( भ. गी. अध्याय १७ वा ), त्याग, त्रिविध-कर्मफल, ज्ञान ज्ञेय ज्ञाता ही त्रिपुटी, करण, कर्म, कर्ता ही त्रिपुटी, त्रिविध कर्म, थिविध कर्ता, विध त्रिबुद्धि, धृति, सुख, (अध्याय १८) वा, इत्यादि प्रकार झाले आहेत.

पाताळ, भूमि आणि स्वर्ग असे **तीनच** मुख्य लोक आहेत असें आपण समजतों.

सध्यां वेद चार आहेत असें जरी मानलें गेल जातें तरी प्राचीन काळीं ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद असे **तीनच** वेद समजले जात. ( त्रैविद्या मां० अध्याय ९–२० ) असत.

साधुपरित्राण, दुष्कृतविनाश आणि धर्मसंस्थापना हीं **तीन** कार्येंच करण्यासाठीं भगवान् अवतरत असतात [ अ. ४ -- ८ ]

गीतेच्या १८ अध्यायांची विभागणी सहा, सहा आणि सहा अशा तीन विभागांतच ज्ञान, कर्म व उपासना या तीन नांवांनीं केली जाते.

**तीन** या संख्येला चिकटून असून सुद्धा बरेच संस्कार, समजुती, संकेत किंवा व्यवहार राहिलेले आहेत. विवाहविधींतील एक शपथ म्हणून 'धर्मेच अर्थेच कामेच **नातिचरामि नातिचरामि नातिचरामि**' अशी शपथ घ्यावी लागते. कोणतीही गोष्ट तीन वेळा बोलली गेली कीं ती पक्की झाली असें समजलें जातें. वचनदानोच्चार सुद्धां तीन वेळांच केला जातो.

भारतांत **त्रिस्थळी** यात्रा तर प्रसिद्ध आहेच. काशी-गया-प्रयाग ह्या तीन धर्मक्षेत्रांची यात्रा केल्याशिवाय यात्रा सफल होतच नाहीं. तसेंच **तीन** नद्यांचा संगम – गंगा, यमुना व सरस्वती– अत्यंत पवित्र समजला जातो.

आर्यवैद्यकांत **कफ, वात व पित्त** असे **त्रिदोष** सांगितलेले आहेत. आणि यावरच सर्व वैद्यकशास्त्र आधारित आहे.

**त्रिविधताप** कुणाला ठाऊक नाहींत ? समर्थ म्हणतात— **संसारसंगे शिणला । त्रिविधतापें पोळला । तोच एक अधिकारी झाला । परमार्थासी** ॥ १ ॥ हे तीन ताप म्हणजे कायिक व वाचिक व मानसिक होते जगाला प्रकाश देणाऱ्या **तीनच** शक्ति आहेत. त्या म्हणजे सूर्य, चंद्र व अग्नि.

धर्भमंत्रपाठाच्या शेवटीं आपण **ॐ शान्तिः शान्तिः** असें म्हणत असतों.

प्रातः, **संध्या** माध्याह्न संध्या आणि सायंसंध्या अशा तीन वेळाच संध्येसाठीं सांगितलेल्या आहेत. तसेच त्रिकाळ स्नान.

पिंडदानप्रसंगीं **पिता, पितामह प्रपितामह** अशा **तीन** पिढयांचाच निर्देश आपण करीत असतो. गोत्रोच्चार सुद्धां तीन प्रवरांचाच प्रामुख्यानें प्रचारांत आहे. यज्ञोपवीताला सुद्धां **तीनच** पदर असतात. माता, मित्र आणि पिता हे **तीनच** निसर्गतः मायेने भरलेले आहेत व हितचिंतक आहेत असे सुभाषितकार वर्णन करतात. ( **माता मित्रं पिता चेति स्वभावात् त्रितयं हितम्** )

यज्ञायागादिक कर्मात तीन प्रकारच्या अग्नींचेंच महत्त्व वर्णिलेले आहे.

बाजाच्या पेटीची तीन सप्तकें, गायनाची गायन, वादन, नृत्य **ही तीनच** अंगें, व्याकरणशास्त्रांत पुल्लिंग स्त्रीलिंग व नपुंसकलिंग हीं **तीन** लिंगे, अशी कैक उदाहरणें आपणास देता येतील.

आपला राष्ट्रीय झेंडा पण **तीन रंगीच** आहे.

आणि आज पहा, सर्वत्र रस्तोरस्ती, गल्लोगल्लीं, सरकारच्या प्रत्येक प्रवासी वाहनावर सर्वत्र संततिनियमन प्रचाराचें बोध चिन्ह **—लाल त्रिकोण—** ही तीन संख्येंतच बसविलेले आहे. संततिनियमनाच्या प्रचाराची ही तऱ्हा कोणाच्या सुपीक डोक्यांतून निघाली कुणाला ठाऊक, पण ही तऱ्हा अत्यंत मूर्खपणाची आहे यांत संशय नाहीं. पण तें कांहींही असो. यांत सुद्धां तीन या संख्येचाच विजय आहे यांत शंका नाहीं. जास्तींत जास्त मुलें सुद्धां त्रिसंख्याबद्ध आहेत ! या बाबतींत बहुतेक तीन मंत्र्यांचीं तीन महाडोकीं सामील झालीं असलीं पाहिजेत. असो.

## एक भाग्यवान संख्या

वरील विवेचनावरून दिसून येईल की तीन संख्या फार भाग्यवान् आहे. एकेकांचे भाग्यच असें उजळून ओले होत असते. पशुपक्षी, वृक्ष, नदी पर्वत वगैरे बाबतीतही हाच भाग्याचा प्रकार आढळून येतो. तोच प्रकार **तीन** या संख्येचा आहे. झाडें काय कमी आहेत कां! पण वटवृक्षाचें माहात्म्य काय आगळेंच आहे. दुर्वांकुरांचा मान फार मोठा आहे. पशूमध्ये हत्तीचें भाग्य फार मोठें! पक्षिगणांत कावळ्याला कोण विचारतो? फक्त श्राद्धपक्षाच्या वेळीच आणि पिंडाला शिवण्यापुरतीच त्याची जरूरी! पण गरुडाचे स्थान पहा! साक्षात् भगवान् विष्णूनीं त्याना वाहन केलें आहे.

एखादा दगड देवाच्या मूर्तीचा आकार घेऊन मंदिरांत पूजाअर्चा घेत असतो तर त्याचा भाऊबंद कोणतीतरी कुठली तरी पायरी बनलेला असतो!

माणसाचेंसुद्धां असेंच आहे. एखादा **ढ-माणूस** मंत्री होऊं शकतो. अन् मग तो राजविलास भोगत असतो. नाचरंग कॅबरे कांही विचारूं नका! हें त्याचें भाग्यच! नाही तर उकिरडा फुंकतच त्याला जन्मभर जगावें लागलें असतें! एक होतो चपरासी! एक होतो मंत्री! पूर्वीच्या राजेरजवाडयांना नाहीसे करून आजकाल हे नवे विलासी विचारशून्य आणि बेजबाबदार राजे निर्माण झाले आहेत. हां हां म्हणता कोटयाधीश होतात! जनतेच्या कल्याणाच्या ऐवजीं स्वतःचेंच कोटकल्याण करून घेत असतात. सत्ता नसती तर ह्याना अडणीवर सुद्धां कोणी ठेवले नसते! असो! पण हें त्यांचें भाग्यच समजले पाहिजे. यांत त्यांची कर्तबगारी किंवा प्रयत्न कांहीच नसतात. त्याची भाग्यरेषाच उमटलेली असली पाहिजे. लायक लोक रसातळाला गेले! बिनलायकी मात्र भाग्ययोगाने मिरवू लागले.

## हे एवढे महत्त्व कां?

**तीन** या संख्येलाच एवढें महत्त्व कां बरे आलें असावें? तीन या संख्येला असा कोणता आधार मिळाला कीं ज्यामुळें या संख्येचें महत्त्व अपूर्व रीतीनें वाढलें आहे अन् ते सतत वाढतच आहे? अन् हें महत्त्व केवळ भारतांतच नव्हे

तर इतरत्रहि वाढत आहे. तीन या संख्येला अनन्यसाधारण महत्त्व शतकानुशतके येण्याला तसेच जबरदस्त पाठबळ असलें पाहिजे. हें पाठबळ कोणाचें असावें बरें? याचा शोध घेत वाचकांनीं कांहीं काळ घालवावा. याचें उत्तर अत्यंत सोपें आहे पण तें पुढील अंकीं दहापांच ओळींतच देणार आहे.

समाप्त

---

# स्वामी विवेकानंद यांचें एक मार्गदर्शक पत्र



प्रिय—

काल तुमचें पत्र मिळालें. त्यांत कांहीं चिल्लर गोष्टी आहेत; पण खुलासेवार हकीकत कांहींच नाहीं. माझी प्रकृति आतां बरीच सुधारली आहे. यंदां येथे थंडी कडाक्याची पडली आहे; पण ईश्वराच्या कृपेनें मला तिची बाधा होत नाहीं. थंडी किती भयंकर आहे म्हणून सांगावें? पण येथले लोकही वस्ताद आहेत. भौतिक शास्त्राच्या ज्ञानानें शीतोष्णादिकांनाही ते पायांखालीं दडपतात. प्रत्येक घराला एक तळघर असून त्यांत एक मोठा बंब ठेवलेला असतो. त्यांतील वाफ नळयांतून

घरांतील सर्व खोल्यांत वावरत असते व त्यामुळें सर्व खोल्या ऊबदार राहातात. यांत मला एकच दोष दिसला; तो हा कीं, घरांत उन्हाळा असतां बाहेर उष्णतामापकांतील पारा शून्याखालीं तीस चाळीस अंश गेलेला असतो. यामुळें घरांतून बाहेर पडतांच एकदम विलक्षण हुडहुडी भरते. या देशांतील बहुतेक श्रीमंत लोक हिंवाळ्याच्या दिवसांत बहुधा युरोपांत जातात. येथल्या मानानें तेथील हवा बरीच ऊबदार असते.

हें पत्र मुद्दाम तुमच्याचसाठी लिहीत असल्यामुळें तुम्हांलाच सांगावयाच्या कांही गोष्टी यांत सांगतों. या पत्राचें पारायण रोज एकदां करून त्याप्रमाणें वागात जावें. ' एस्. ' चें एक पत्र आलें आहे. त्यानें आरंभलेला उद्योग ठीक आहे. पण आपणांस आतां कांही संघटित उद्योग केला पाहिजे. या पत्रांत तुम्हालाच उद्देशून लिहिण्याचें कारण हेंच कीं, तुमच्या अंगी थोडेंबहुत संघटना चातुर्य आहे. पण तें अद्यापि बाल्यावस्थेंत आहे. परमेश्वराच्या कृपेनें तें लवकरच पूर्णावस्थेला येईल अशी मला आशा आहे. आजूबाजूच्या विषम परिस्थितींतहि तुम्ही समतोल राहू शकतां हेंच तुमच्या संगटनासामर्थ्याचे द्योतक आहे. पण हा समतोल पणा स्वतःच्या अंतर्गत सृष्टीत जसा तुम्हांस राखतां येतो, तसाच तो बाह्य संसारातही राखतां आला पाहिजे. या करितांच पुढील सूचना मी करीत आहें.

१. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा तीन प्रकारच्या आपत्ती जगांत आहेत; तथापि ही स्थिती स्वभावजन्य नाही असे शास्त्रें सांगतात यामुळेंच या अपत्ती टाळतां येण्याजोग्या आहेत.

२. आधिभौतिक आपत्तीचा उगम जातिभेदापासून झाला आहे, असें भगवान् बुद्ध म्हणतात. मग हा भेद विशिष्ट जातींतल्या जन्मामुळें, आंगच्या विशेष गुणांमुळें अथवा संपत्तीच्या आधिक्यामुळें उत्पन्न झालेला असो; त्याचें स्वरूप कसेंही असलें तरी आधिभौतिक आपत्ती त्यामुळें अवश्य उद्भवतात. लिंगवर्ण-आश्रमादि भेद आत्म्याच्या ठिकाणीं नाहींत. त्यामुळें भेद कोणत्याहि प्रकारचा असला तरी त्यांतून संघटना निर्माण होणार नाहीं. भेद हा बोलून चालून अनेकरूप आणि संघटना एकरूप. अशा स्थितींत पहिल्या अवस्थेंतून दुसरी निर्माण करू पाहाणें म्हणजे चिखलानें चिखल धुण्यासारखें आहे.

३. अविद्या हेंच सर्व दुःखाचें मूळ आहे; आणि निष्काम कर्मानें अविद्येचा

नाश होतो, असें भगवान् श्रीकृष्ण सांगतात. 'किंकर्म किमकर्मेति...' इत्यादि वचनांनी कर्माची गहनताही ते प्रतिपादन करितात.

४. ज्या कर्माच्या योगें आपली चैतन्यशक्ति अधिकाधिक स्पष्टदशेला येते तेच खरें कर्म. ज्याच्या योगें ऐहिकाची लालसा वाढते तें अकर्म.

५. याकरितां कर्म आणि अकर्म हा भेद नित्य लक्षांत ठेवून आपण वागलें पाहिजे. व्यक्तीचे जन्मजात संस्कार, तिच्या भोंवतालची देशकालादि परिस्थिती आणि तिचे वयोमान इत्यादिकानी कर्म आणि अकर्म यांचे स्वरूप वेगवेगळें असू शकेल हें उघड आहे.

६. यज्ञयागादि क्रिया प्राचीन काळाला अनुरूप होत्या; पण आतांच्या काळी त्या अयुक्तच म्हटल्या पाहिजेत.

७. राम कृष्णांच्या अवताराबरोबर सत्ययुगाला आरंभ झाला आहे.

८. ज्ञानखड्गाने नास्तिक्य वादाचा नाश करावयाचा हे या अवताराचे कार्य आहे. भक्तीच्या पायावर सर्व जग एकरूप व्हावयाचे आहे. या अवतारांत रजोगुणाला थारा नाही यामुळें, कीर्ति पैसा इत्यादिकांच्या इच्छेलाही येथें अवकाश नाही, भगवानांचा आदेश पुढे ठेवून त्यांनी दाखविलेल्या मार्गाने जो जाईल तो धन्य. मग तो जो त्यांना अवतारी पुरुष समतो अथवा न समजो.

९. जगांत अनेक धर्मप्रवर्तक होऊन गेले. त्यापैकीं कोणीही भलताच मार्ग दाखविलेला नाहीं. आपापल्या काळाला अनुसरून त्यांनी चांगलाच कार्य भाग केला; पण आपण आतां त्यांच्याही पुढें गेलें पाहिजे. बरें, चांगलें आणि उत्कृष्ट अशी श्रेणी लागणे हें स्वाभाविक आहे.

१०. याकरितां स्वतःच्या कार्याचा धागा त्यानी जेथं सोडला आहे, तेथें तो पकडणें आपलें काम आहे. त्याच्या अनुरोधानें आपण अधिकाधिक उच्चावस्थेचा मार्ग आक्रमण केला पाहिजे. त्यांच्या अंतिम उद्दिष्टाला यत्किंचितही धक्का न लावतां हें कार्य आपणास करावयाचे आहे. आजची आपली सामाजिक परिस्थिति अगदीच प्रतिकूल नाही. तथापि तिच्यांत अधिक सुधारणा केली पाहिजे.

११. स्त्रियांची स्थिति सुधारल्यावांचून जगाच्या कल्याणाच्या गोष्टी फुकट आहेत. एकच पंख कितीही बळकट असला तरी पांखराला उडतां येत नाहीं.

१२. यासाठीच भगवान् श्रीरामकृष्णांनी स्वतःला स्त्रीसुद्धां कल्पिलें; आणि स्त्रीचा पोषाख करून स्त्रीची मानसिक अवस्था स्वतःच्या ठिकाणीं स्थापण्याचा अभ्यास त्यांनी केला. ' आई, आई ' असा टाहो ते नित्य फोडीत, तो यासाठीच, आणि यासाठीच ते प्रत्येक स्त्रीला जगन्माता म्हणत.

१३. याकरितां केवळ स्त्रियांसाठीच एखादा मठ स्थापण्याचा उद्योग मी आधी करीत आहें. त्यांतून गार्गी, मैत्रेयी अथवा त्यांहून अधिक उच्च स्त्रिया मिर्माण व्हाव्या.

१४. नुसत्या बाह्यावडंबरानें कोणतेंही महत्कार्य तडीस जात नाही. प्रेम आणि सत्यनिष्ठा या गुणांची जाज्वल्य भक्ति आणि तीबरोबरच प्रचंड कार्यकारी शक्ति या संयोगानेंच मोठी कामें पार पाडतात. या गुणसमुच्चयांत पौरुष आहे.

१५. कोणाशीही तंटा करण्याचें कारण आपणांस नाही. आपण आपलें कार्य करावें आणि दुसऱ्यास त्याचें करू द्यावें. सत्याचा जय होणार हें जर खरें तर वादविवादांचें काय कारण ?

बालभाव आणि गंभीरता ही दोन्ही आपण स्वतःच्या ठिकाणीं एकत्र नांदविलीं पाहिजेत. सर्वांशी मिळूनमिसळून वागावें. अहंकाराची कल्पनाही सोडून द्यावी; आणि कोणत्याही पंथाच्या एकांगी विचारांना चिकटून बसूं नये. निष्कारण वाद घालीत बसणें हें मोठें पाप आहे.

घोष यानें माझी तुलना येशू ख्रिस्ताशी केली आहे, असें 'एस्.'च्या पत्रावरून समजते. असल्या प्रकारच्या गोष्टी आपल्या देशांत कदाचित् खपतील; पण त्या येथें प्रसिद्ध झाल्या तर मी रोषास पात्र होण्याचा संभव आहे. विचारस्वातंत्र्य सर्वांना हवें आणि मीही तें कोणापासून हिरावून घेऊं इच्छीत नाही. आपलें म्हणणें लोकांवर लादूं इच्छिणारा ख्रिस्ती पापी मी नाही.

'के.' ने त्या सभेच्या विषयीची बाकीची हकीकत पाठविली नसल्यास ती न पाठविण्याविषयी त्याला कळवावें. मला मुख्य निबंध मिळाला म्हणजे पुरे. सभेचा बाकी तपशील न समजल्यास चालेल.

माझा जम येथें आतां बराच बसला आहे. पुष्कळ सभ्य स्त्रीपुरुषें मला मानतात. ख्रिस्ती भटांनीं कांही दिवस माझ्याविरुद्ध खटपट करून पाहिली, पण तिचा उपयोग होत नाहीसें पाहून तेही आतां थंड झाले आहेत. कोणत्याही कामाला अशी अनेक विघ्नें येणारच. पण शांति न सोडतां आपण आपलें काम चालविलें म्हणजे अखेरीस आपणास जय अवश्य मिळतो. मि...यांनी

मजवर बराच ताशेरा झाडला आहे असें कळतें. पण त्यांना उत्तर देण्याची कांही जरूर आहे असें मला वाटत नाही. पहिली गोष्ट अशी कीं, उत्तर देण्याची आवश्यकता नाही; आणि दुसरें कीं, अशा लोकांना उत्तर देण म्हणजे आपण स्वतः त्यांच्याच पंक्तीत जाऊन बसणें होय. तूं काय वेडा झाला आहेस ? कोणाही उपटसुंभ्या-बरोबर मी अशा लढाया करीत बसूं काय ? या गृहस्थापेक्षां कितीतरी अधिक वरचढ असे दुसरे लोक माझें म्हणणें पूज्यभावानें ऐकतात. याकरितां असल्या मजकुराची वर्तमनापत्रें याउपर मजकडे केव्हांही पाठवीत जाऊं नको. तीं तुमची भांडणें तुम्हांलाच लखलाभ असोत. असले तंटे वर्तमानपत्रांत चालू ठेवणें आपल्या कार्याला एका काळीं अवश्य होतें; पण तो कार्यभाग झाला आणि या वर्तमानपत्री भांडणाची जरूर आतां उरली नाही. मनुष्यानें कीर्ति मिळविली म्हणजे तिजबरोबर एक नवी अडचणही त्याच्या गळ्यांत पडत असते. मग त्याचें खासगी चरित्र संपुष्टांत येतें. त्याचा एक शब्दही लोकांपुढें आल्यावांचून राहात नाही.

आपलें कार्य हातीं घेण्यापूर्वी श्रीरामकृष्णांचीप्रार्थना करून त्यांचा आशीर्वाद मागावा. मठासाठीं विस्तीर्ण पटांगण मिळविण्याची खटपट आधी करावी.

मग बाकीच्या गोष्टी हळू हळू जुळू लागतील. आपला मठ आपल्याच पायांनीं उभा राहणार आहे. त्यांची काळजी तुम्हांस नको.

'के.' नें चांगलें काम केलें आहे. त्याला आणि दुसऱ्या सर्वांना माझी शुभेच्छा कळवावी. मद्रासेकडील कामें आपल्या तेथल्या मित्रांच्या अनुषंगानें चालावीं. सर्व कार्यभाग त्यांच्याच हातीं असूं देऊन तुमच्यापैकीं कोणीतरी मधून मधून तेथें जावें. कीर्तीची आणि लोकांवर छाप पाडण्याची इच्छा केव्हांही बाळगू नये. मी या जगावर आहें तोंपर्यंत श्रीरामकृष्णच माझ्याद्वारें आपलें कार्य करीत आहेत, असा पक्का भरंवसा तुम्हाला असेल तोंपर्यंत तुम्हाला कसलीही भीति नाहीं.

'ए.' यानें पाठविलेलें 'श्रीरामकृष्ण पंथी' हें काव्य बरेंच सरस आहे. पण आरंभाला आदिशक्तीचा उल्लेखही त्यांत नाहीं ही मोठीच उणीव आहे. दुसऱ्या आवृत्तीत ही उणीव भरून काढण्याची सूचना त्याला द्यावी. आपणांकडे सारें जग आतां निरखून पाहात आहे, ही गोष्ट नेहमी ध्यानांत बाळगा. आपला प्रत्येक शब्द व आपली प्रत्येक क्रिया यांचे निरीक्षण लोक बारकाईने करितात. कोणतेही कार्य करतांना हा मुद्दा नेहमी लक्षांत बाळगा.

मठाची जागा कलकत्त्याहून थोडीशी दूर असली तरी चालेल. आपली कर्तबगारी अशी असली पाहिजे कीं लोकांनी तेथें धावत यावें. श्री. विजयगोस्वामी, चक्रवर्ती इत्यादि मित्रांना माझे नमस्कार कळवावे.

आपणांला आतां व्यवहारिक कार्य करावयाचे आहे. व्यवहार म्हटला की थोडाबहुत तरी वादविवाद आलाच. यासाटी प्रतिपक्षाला जिंकण्याची शस्त्रास्त्रें आपण जय्यत ठेविली पाहिजेत. याकरितां इंग्रजी आणि संस्कृत या भाषांचा चांगला अभ्यास करा. 'के.' चे इंग्रजी सुधारत आहे. पण उलटपक्षी 'एस्.' चे तद्विषयक ज्ञान कमी होत असल्याचे दिसते. आपल्या भाषेची नुसती शोभा वाढविण्याकडे त्याचा कल आहे. हें अवडंबर सोडून देण्याविषयीं त्याला कळवावें. मुद्दा जाऊं न देतां अलंकारिक लिहिण्याला परकी भाषेवर तसेंच विशेष प्रभुत्व लागते. असें प्रभुत्व मिळविणें ही गोष्ट फार कठीण आहे.

मुलांनो, तुम्ही मान्यांनी आरंभ तर फारच चांगला केला आहे. अशाच रीतीने तुम्ही पुढे चाला. मत्सराचा सर्पदंश मध्येंच कोठें न झाला तर तुम्हीं अखेर जिंकाल ही माझी खात्री आहे. आपण भक्तांचे सेवक व्हावें, हीच खरी ईश-भक्ति. 'मद्भक्तानां च ये भक्तास्ते मे भक्ततमा मताः।' असें त्याचें वचन आहे. तुम्ही सर्वांनीं आतां थोडीबहुत गंभीरता धारण करण्यास शिकावें. सध्यां कोणताही ग्रंथ मी लिहीत नाही. तथापि माझ्या विचारांची टांचणें मी अरीत असतो. धर्मग्रंथ हें परोक्षतत्त्वाचें स्पष्टरूप आहे. सत्य एकच, पण तें वेगवेगळ्या रुपांनी स्पष्टत्वास येतें इतकेंच. एकच सत्य स्पष्ट करण्यास श्रोत्याच्या अधिकारपरत्वें वेगवेगळी भाषा योजणें आवश्यक असतें. हा मुद्दा 'एस.' च्या ध्यानांत आला आहे, हें ठीक झालें. ग्रंथरचना सावकाश केव्हांतरी होईल. हिंदुधर्म अथवा दुसरा कोणताही विशिष्ट धर्म असें म्हटलें की, त्याबरोबर आकुंचित कल्पना आपोआपच मनांत उभी राहाते. हिंदुधर्मावर व्याख्यान असें म्हटले की, तेथें एक तरी श्रोता उभा राहील असें तुम्हांस वाटतें काय? नुसत्या नावाच्या आकुंचितपणालाच भिऊन हे लोक पळत सुटतील. श्रीरामकृष्णप्रणित धर्म आपणांस सांगावयाचा आहे. वाटल्यास हिंदूंनी त्याला हिंदुधर्म म्हणावें आणि दुसऱ्यांनी दुसऱ्या नांवानें त्याला ओळखावें आपल्याला नांवाशीं कर्तव्य नाही. 'शनैः पंथाः' या न्यायाने आपण आपलें काम करीत राहूं या आपला नवा बंधु 'बी' याला माझा आशीर्वाद सांगावा. अहोरात्र भाषणे करतां करतां एखादें चिटोरें लिहिण्यालाही मला वेळ मिळात नाही. याकरितां माझ्या

पत्राची वाट पाहात बसूं नका' पावित्र्य, शांति आणि चिकाटी या गुणांच्या बळावर आपले काम तुम्हीं आपणच केले पाहिजे. श्रीरामकृष्णाचे भक्त म्हणविणाऱ्या लोकांकडून पैशाची थोडीबहुत मदत तुम्ही मिळविलीच पाहिजे. लोकाना हें स्पष्ट सांगण्याला लाजूं नका. अशी मदत न मिळाली तर तुमचा मठ कसा चालणार ?

तेथून मी लवकर परत येण्याने कांही विशेष लाभ होणार नाही. पहिली गोष्ट अशी की, येथें अल्पसा ध्वनि उठला तरी त्याचा प्रतिध्वनि तिकडे प्रचंड उमटतो. दुसरें असें की, या देशांतील लोक कल्पनेपलीकडे श्रीमंत आहेत आणि दुसऱ्याला द्यावें हें धैर्य त्यांच्या ठिकाणी आहे. आमच्या देशांतील लोकांजवळ पैसा नाही आणि दातृत्वाची इच्छा त्याहून नाही.

हळू हळू सर्व गोष्टी तुम्हांला कळूं लागतील. श्रीरामकृष्ण यांचा जन्म केवळ हिंदुस्थानापुरताच नव्हता. आपल्या आकुंचित कल्पनांना मिठ्या मारूनच आम्ही अवनतीच्या मार्गाला लागलों; असल्या एकांगी कल्पनांचा समूळ उच्छेद होईपर्यंत आत्मकल्याणाच्या मार्गावर आमचें पाऊल पुढें पडणें अशक्य आहे. माझ्याजवळ तितका पैसा असता तर तुम्हांपैकीं प्रत्येकाकडून मीं जगभर प्रवास करविला असता. नजर विस्तृत झाल्याशिवाय विशाल कल्पनांचा उदय अंतःकरणांत होत नाहीं कालेंकरून या तत्त्वाची सत्यता तुम्हांला पटूं लागेल. आपलें कार्य तुम्ही हळू हळू करीत राहा. प्रत्येक महत्कार्य मंदगतीनें चालावें असाच ईश्वरी संकेत दिसतो.

'डी.' आणि 'एच्.' बद्दल तुम्हांपैकीं कोणीही मला कांहींच कळवीत नाहींत हें कसें ? ते कोठें असतात आणि काय करितात याची सविस्तर माहिती कळली तर मला फार आनंद होईल. 'एस्.' हा अद्यापिही विषादाच्या स्थितींत आहे, असें लिहितां; पण ज्याचें मन गंगोदकासारखें शुद्ध नाही. त्याला विषादाची प्राप्ति व्हावी हेंही ठीकच. तो अद्यापि निष्काम झालेला नाही. असो; कालांतरानें तो सुधारेल. मनांतल्या वांकड्यातिकड्या वस्तु काढून टाकून तो तें सरळ करील तर त्याची दुःखनिवृत्तीही त्वरित होईल. ' आर्. आणि एच्. यांना आशीर्वाद कळवावा. आर्. वर श्रीरामकृष्णांचें निरतिशय प्रेम होतें हें कधीहि विसरू नये.

कोणालाही भिण्याचें कारण नाही. परमेश्वराची कृपा आपणांवर आहे तोंपर्यंत आपल्या नाकावर ठोंसा देण्याचें सामर्थ्य कोणालाही नाही. जीव जाण्याची पाळी आली तरीही आपण घाबरूं नये. सिंहाच्या छातीने आणि अट्टाहासानें आपण कामाला लागलें पाहिजे. पण सिंहाच्या निधड्या शौर्याबरोबर आपल्या अंतःकरणांत

सुमनाची कोमलताही पाहिजे. 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' अशी लोकोत्तर पुरुषांची अंतःकरणें असतात. आपण असे लोकोत्तर होऊ या. यंदांचा श्रीरामकृष्ण महोत्सव मोठ्या कडाक्यानें होऊ द्या. प्रसादाला पक्वान्नें हवीतच असे नाही काही तरी प्रसाद प्रत्येकाच्या हातावर थोडाथोडा ठेवला तरी पुरे. तो वांटण्याकरितां खापराचे परळसुद्धां आपणांस चालतील. पण या खाद्य प्रसादापेक्षां मानसिक प्रसादची पक्वान्नें मात्र मनमुराद वाढा. श्रीरामकृष्णचरितावर रोज प्रवचनें होऊं द्या. श्रुतिवेदांतादि ग्रंथ पूजेला मांडून त्यांचें षोडशोपचारें अर्चन करून त्यांचीच आरती करा. जुन्या पद्धतीच्या आमंत्रणपत्रिका आतां कोणाला पाठवू नका. 'आमन्त्रयं भवन्तं साशीर्वाद भगवतो रामकृष्णस्य बहुमानपुरःसरं च।, अशा प्रकारची एखादी ओळ छापून पाठवली तरी पुरे; आणि या पत्रिकेबरोबरच मठासाठी मदतही मागावी. पैसे कोठें आणि कोणाच्या नांवावर पाठवावयाचे याचा स्पष्ट उल्लेख त्या पत्रांत असावा. देशी भाषेबरोबर अशा अर्थाची इंग्रजी पत्रेंही काढावी. पण त्यांत परमहंसांचा उल्लेख करतांना 'लॉर्ड रामकृष्ण' असे शब्द कधीच वापरू नयेत. हा शब्दसमुच्चय अर्थशून्य आहे. याऐवजी इंग्रजी लिपीत 'भगवान्' असें लिहावें.

अशा रीतीनें पुष्कळ पैसा जमा झाला तरी खर्च अगदी बेतानें करावा; आणि बाकीची शिल्लक आपल्या पुढील खर्चासाठी राखून ठेवावी. प्रसाद वांटण्यांत अतिशय दिरंगाई करूं नये. तिष्ठत बसून कंटाळा येईपर्यंत प्रसादासाठीं लोकांना वाट पाहाण्यास लावूं नये. अन्नदान करतांना अन्न शिळें आणि बेचव न होईल अशी खबरदारी घेणें चांगलें. स्वयंपाकाचें पाणी उकळून फिल्टरमधून गाळून घ्यावें. असा परिपाठ तुम्ही नेहमीं ठेवला तर हिंवाच्या सांथीचें नांवही तुम्हास ऐकूं येणार नाही. शरीरप्रकृतीकडे अत्यंत बारकाईनें लक्ष देणे हे आपलें आद्य कर्तव्य आहे. आपणां पैकी प्रत्येक जनाने अगदी निकोप राहिलें पाहिजे धरणीमातेवरच पडून झोंप घ्यावी लागणार नाही इतक्या सोईपुरता पैसा तुम्हांला. मिळवितां आला तर फार चांगलें. तसेच वस्त्रप्रावरणही स्वच्छ ठेवण्याविषयी दक्षता बाळगावी. गलिच्छ पांघरुणे हे रोगाचें माहेरघर आहे. नैवेद्यासाठी थोडेसे पायसान्न म्हणजे दूधभात असला तरी पुरे. परमहंसांना तर येवढेच खाद्य आवडत असे. राजसिक आणि तामसिक अन्न खाणे कोणालाही हितावह नाही अर्चनांतील बाह्यावडं-बर कमी करून त्याऐवजी गीता उपनिषदे आणि दुसरे पवित्र ग्रंथ यांच्या पठनाचा समावेश त्यांत करावा. मुख्य मुद्दा इतकाच की जडपूजन शक्य तितकें कमी करून चैतन्योपासना शक्य तितकी वाढवावी. एखाद्यां विशिष्ट व्यक्तीसाठी अथवा राष्ट्रासाठी

श्रीरामकृष्ण अवतरले नव्हते. साऱ्या जगाला धर्मज्ञान देण्यासाठी त्यांचा अवतार होता. ही गोष्ट तुम्हांला पटली असेल तर त्यांच्या संदेशाची समजूत साऱ्या जगाला पटेल असें तुम्ही केलें पाहिजे. रामकृष्ण विश्वव्यापी तत्वें सांगत होते हें साऱ्या जगापुढें तुम्ही स्पष्ट केलें पाहिजे. रामकृष्णांचें चरित्र ज्याला जसें दिसलें, तसें तें त्यानें लिहिलें असेल. पण यासाठीं तुम्ही त्यालाच चिकटून बसावें असें नाही कोणत्याही विशिष्ट स्वरूपाचे चरित्र आपण सर्वथा ग्राह्य मानूं नये, अथवा अशा एखाद्या चरित्राचा प्रसारहि आपण करू नये. अशी चरित्रें कितीही प्रसिद्ध झाली तरी जोंपर्यंत आपल्या नांवाशी संलग्न होऊन ती वावरत नाहीत. तोपर्यंत आपल्या कार्याला त्यांचा कांही उपसर्ग लागणार नाही. अरे, आपण सर्वांनाच होय होय म्हणावें, सर्वांचे म्हणणें मुकाट्यानें ऐकून घ्यावें, पण करतांना आपलेंच करावें

'एम्' हा आपणांस अनेक प्रकारें मदत करीत आहे. त्याजबद्दल त्याचे किती उपकार मानावे! तो खरोखरच उदार दिलाचा मनुष्य आहे... याला असें सांगावें की, श्रीरामकृष्णांच्या शिष्यमंडळाची सेवा करण्यानेंच त्याचें परमकल्याण होणार आहे. मात्र ती सेवा लक्षपूर्वक बजावली पाहिजे. तुम्ही सर्वांनी आरंभ तर फार चांगला केला आहे. 'शाबास!' इतकेंच मी म्हणतो. आपणांस हवें आहे तें हेंच. तुम्ही सारेच ताऱ्यांसारखे चमकाल अशी मला आशा आहे. 'जी.' ला राजपुतान्यांत पाठवावें. तिकडील जमीनदार मंडळींत त्याजबद्दल चांगला आदर आहे.

# ईश्वर साक्षित्वाच्या खुणा

**निवदेक:— चिपळूणकर गुरुजी**

**खूण ९ वी—**

परमेश्वर हा एकमात्र जगन्नियंता म्हटल्यानंतर व यच्चयावत् मानव जात एकच म्हटल्यानंतर मानवाचा म्हणून एक मानवता धर्मच असावयास हवा. परंतु कलियुगांत व चालू काळात ही गोष्ट होणे नाही. वास्तविक पाहता मनुष्याने सर्व धर्मांचे ठिकाणी व सर्व दैवतांचे ठिकाणी—मग ती दैवते निराळ्या धर्माची असली तरीही—एकेश्वरी भाव ठेवावयास हवा. असा भाव ठेवल्यास तसेच सुंदर अनुभवही येतात.

निवेदित गोष्ट ही साधारणपणे सन १९५८ च्या आरंभीची आहे. मला प्रसंगवशात् कल्याण ( जिल्हा—ठाणे ) जवळच असलेल्या दरगा हाजी-मलंग येथें दर्शनास जावयाचें होतें. एक शुभ दिवस बघून मी भल्या पहाटेस माझ्या भाच्यास बरोबर घेऊन निघालो. कल्याण येथून बसनें हाजी-मलंग, डोंगराच्या पायथ्यापर्यंत येऊन पोहोचलो व पांच मिनिटे विश्रांति घेऊन डोंगर चढावयास आरंभ केला. यावेळीं मी थोडासा रुग्णावस्थेंत असल्यानें सावकाश डोंगर चढत होतो. तरीही मला दम लागत होता. साधारणपणें अर्धा डोंगर जेमतेम मेहनत करून आम्ही चढून गेलो. अर्ध्यावर आल्यावर मला अत्यंत थकवा वाटूं लागला व मी थकलो असल्यानें तेथूनच परत फिरण्याचा विचार केला. माझा भाचाही लहान असला तरी त्यानें मला धीर देण्याचा प्रयत्न केला. परंतु येथें अर्ध्यावरच थोडावेळ विश्रांति घेऊन जाऊं असें तो म्हणाला. म्हणून जवळच्याच एका शिळेवर आम्ही विश्रांति घेत बसलो.

परमेश्वरदर्शनाची उत्कंठा जितकी तीव्र तितका ईश्वरी साक्षात्कार किंवा ईश्वरी प्रसाद लवकर होतो. अशी सर्व संतमंडळीनी ग्वाही दिलेली आहे. याचा प्रत्यय मला आला. आम्ही शिळेवर विश्रांति घेत बसलो असतां एक शेतकऱ्यासारखे दिसणारे वृद्ध जोडपे तेथें आलें. त्यांनी मी थकलेला पाहून माझी चौकशी केली व असेच वर जा, तुम्हाला कांहीं त्रास होणार नाहीं. मात्र दर्शन घेतल्याशिवाय परत

फिरू नका. सोबत ही माझी काठी घेऊन जा, असें म्हणून आपल्याजवळची पांढरी सारखी दिसणारी एक काठी मला दिली. त्या वयस्कर व माता-पित्यासमान दिसणाऱ्या किसान-युगुलाचे उपदेशाचे शब्द ऐकून व (जणू कांहीं) आशीर्वादाने भारलेली काठी हातांत घेऊन आम्ही डोंगर चढण्यास आरंभ केला. थोडे चालून गेल्यावर मागे पाहिलें तर पुन्हा ते किसान-युगुल आम्हाला दिसलें नाही. परंतु त्याचवेळी त्यांचे बरोबर एक लहानसे कुत्रें होतें ते मात्र आमच्याबरोबर येत होतें. मनांत थोडासा आश्चर्यचकितच होऊन मी पुढें चालू लागलो. याप्रमाणें खरोखरच काहीहीं त्रास न होता मी व माझा भाचा पूर्ण उत्साहानें दर्ग्यापर्यंत पोहोचलो. थोड्या वेळापूर्वीच्या थकव्याचा मागमूसही नव्हता. श्वानशावक मात्र बरोबर होतें.

तेथें गेल्यावर यथासांग पूजन अर्चन मला करावयाचें होतें; ते करून आम्ही परत फिरलो. परत येतांना मध्यावर असलेल्या एका विश्रांति गृहांत चहा-पानासाठीं मात्र थांबलो असतां आपण आपल्याबरोबर असलेल्या त्या श्वानशावकाला ही कांहीं द्यावें म्हणून पाहूं लागलो तर तेंही कोठें दिसलें नाहीं. आम्हाला त्याच्या अदृश्य होण्यानें फारच हळहळ वाटली. परंतु ईश्वरानें त्याचा रक्षक आपल्याबरोबर सतत दिला असतांना आम्ही मात्र त्याला कांहींच देऊं शकलो नाही या गोष्टीचे जास्त दुःख झालें; परंतु त्या वस्तुस्थितींत आम्हाला कांही करणें शक्य नव्हतें. शेवटीं आम्ही घरी परत आलो. मला धीर व स्फूर्ति देणाऱ्या त्या वृद्ध किसान-युगुलानें मला दिलेली आधाराची काठी ईश्वरी कृपेची खूण म्हणून आजतागायत माझ्याजवळ आहे. ईश्वराचे एका वेगळ्या स्वरूपांत व वेगळ्या वेषांत दर्शन झालें. देवाची प्रेरणा त्यानेंच पूर्ण करून घेतली.

परमेश्वरावर अनन्य निष्ठा ठेवली म्हणजे तो निष्ठेला व त्याच्या ब्रीदाला जागतो यांत शंकाच नाहीं. प्रतीकाच्या रूपानें तो त्याची निष्ठा त्याच्याच ठिकाणीं दृढ करीत असतो; कारण त्यानेंच म्हटले आहे की, :—

**“ यो यो यां यां तनुं भक्तः**
**श्रद्धयाऽर्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याऽचलां श्रद्धां**
**तामेव विदधाम्यहम् ॥ ”**

# ब्रह्मर्षि धुंडिराज विनोद

लेखकः—चिपळूणकर. गुरुजी.

( दि. १२ । १ । ७१ रोजी येणाऱ्या न्या. विनोदांच्या जयंती निमित्त )

**" ध्वनिमया भव्य ही, विश्ववीणा वाजे ।**
**अभंग हे उसासे, तियेचेच. ॥**

**पक्षी समुद्र हे, तसे वेडे वारे ।**
**गुंगती ना सारे, गीत गाता ॥**

**तसाच गातो मी, मला का हासता ।**
**नसे माझी सत्ता, इथे काही ॥ "**

**( अभंग-संहिता-पृष्ठ २५ )**

ब्रह्मनिर्मित चराचर विश्व गतिमान आहे. तसेच ते ध्वनिमय आहे. या विश्वाच्या गतीबरोबर अखंड, सदोदित एक अनाहत नाद आपल्या लहरी वातावरणात फेकीत आहे. ज्यावेळी या लहरी एकाद्या संत देहात प्रवेश करतात त्या वेळी त्याची प्रतिभा-शक्ति जागृत होऊन या लहरींना शब्द-रूप प्राप्त होते. असे जे शब्द बाहेर पडतात ते चिरंतन असतात. विश्वाच्या गतीबरोबर ते गतिमान होतात आणि म्हणून त्यांना गेय स्वरूप येते. अनाहत नादाच्या लहरी ' अभंग ' आहेत, म्हणूनच शब्दांकित झालेल्या लहरी ' अभंग ' होता. त्यांना ' भंग ' नाही व म्हणूनच ते ' अभंग ' होत.

उपरोक्त काव्य पंक्तीत कवी म्हणतो, की, "ही भव्य विश्ववीणा दिव्य स्वरूपात ध्वनिमया झाली आहे. तो ध्वनि, ते गीत, या चराचरातील पक्षी, समुद्र व वारे अत एव विश्वाशी अंतर्बाह्य तादात्म्य पावणाऱ्या गोष्टीं बरोबर हितगुज करीतात. आणि हे सारे त्या गीतात आणि गीताबरोबर सृष्टीशी

एकरूप होतात. रंगून जातात व गुंगून जातात. कवीने याच तीन गोष्टींचा उल्लेख कां केला ? कारण, विश्वाचे नीतिनियम पाळून शिवाय स्वच्छंदपणे सृष्टीबरोबर वागणाऱ्या या तीन गोष्टीच आहेत. पूर्व-जन्मीच्या पुण्यांशेंकरून या लहरी या कवीच्याही हृदयांत शिरतात, प्रविष्ट होतात आणि आमचा कवीही ध्वनितया विश्ववीणेच्या झंकाराबरोबर 'अभंग' ध्वनींचे ' अभंग ' गाऊ लागतो. कवीने म्हटले आहे, की ही स्फूर्ति आहे, अनाहताची प्रेरणा आहे. त्या 'प्रेरणे'नेच माझ्याकडून हे 'अभंग' लिहविले जात आहेत. गायले जात आहेत आणि इथे माझ्यावरही माझी सत्ता नाही तरी या गाण्यांबद्दल तुम्ही मला कां हसतां ? तर नियतीच्या प्रेरणे कडे पाहा. त्या अफाट, अनंत भरून राहिलेल्या विश्वाच्या अनंततेकडे पाहा, आणि माझे ' गीत ' समजून घ्या. "

असे हे दिव्य गीत गाणारा व विश्वाच्या अनंतते कडे कुतूहलाने पाहणारा कवी म्हणजेच आजच्या युगातील एक समर्थ, महर्षि, गुरुदेव 'धुंडिराजशास्त्री विनोद ' हे होत. कवीचे सूपूर्ण नांव धुंडिराज गोविंद विनोद, असे असले तरी ते ' गुरुदेव ' ' न्यायरत्न ' या नांवानेच जास्त ज्ञात होते.

न्यायरत्न विनोद यांचे मूळ गांव अलिबागेजवळ ' पेडांबे ' हे होय. जन्मस्थळ ' पेडांबे ' येथील ' केतकीचा मळा. या केतकीच्या मळ्यात ' गोविंद-लक्ष्मी विनोद ' या सदाचार-संपन्न दांपत्याचा गृहस्थाश्रम चालू होता. त्याना पुत्र-संतान नव्हते. एक सुलक्षणी, सुदर्शनी कन्या होती. ईश्वरी योगायोगानें अशाच एक मंगल दिवशी माध्यान्हीच्या वेळी एक सिद्ध सौभाग्यवती लक्ष्मीच्या दारी अवतीर्ण झाला, ऐन दुपारी द्वारो येणारा महात्मा श्रीदत्तात्रयच असतो असे म्हणतात. या सिद्धाच्या आशीर्वादकरून सौ. लक्ष्मीदेवींच्या पोटी दि. १२ । १ । १९०२ रोजी बाल धुंडिराजाचा जन्म झाला. घरच्या मध्यम वर्गीय किंबहुना थोडयाशा प्रतिकूल परिस्थितीतच धुंडिराजाचे प्राथमिक शिक्षण झाले. माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण मुंबईस झाले. उपजतच पिंड गूढातून निर्माण झाल्यामुळे म्हणा किंवा आजच्या आधुनिक जगात एक महान् तत्त्वज्ञ-धर्मज्ञ, न्यायज्ञ, असा पुरुष निर्माण व्हावा अशी नियतीची इच्छा असल्या-मुळे म्हणा, धुंडिराजाना गूढतेचा व विश्वातील अनंततेचा ध्यास लागला.

पुढे त्यांचा श्रीशंकराचार्य यांचे बरोबर तत्त्वज्ञान विषयक संबंधी संबंध आल्यामुळे त्यानी धुंडिराजास ' न्यायरत्न ' या पदवीने विभूषित केले. यापूर्वीच त्याना ' शास्त्री ' ही पदवी मिळालेली होती. या पुढील जगास युवक धुंडिराज हा " न्यायरत्न धुंडेराज शास्त्री विनोद " या नावाने परिचित झाला.

न्यायरत्न विनोद यांचा मूळ ओढा गूढवादाकडे असल्यामुळे त्यांनी मंत्रशास्त्र, तंत्रशास्त्र, बीजाक्षरशास्त्र, यंत्रशास्त्र, (ही यंत्रें गूढविद्येतील यंत्रें आहेत.) यांचा अभ्यास केला व त्यात संपूर्ण प्रावीण्य मिळविले. या विद्यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी भारताचा मेरुमणि हिमालय पर्वताच्या परिसरात अनेकदां यात्रा व वास्तव्य केले आहे. तेथे त्यानी सिद्धांच्या व प्राचीन पुरुषांच्या भेटी घेतल्या व त्यांचे बरोबर संवाद, वाद प्रतिवाद, मैत्री, सेवा वगैरे सर्व करून दृक्‌सिद्धी, वाक्‌सिद्धी, स्पर्शसिद्धी, स्पंदविद्या वगैरे सर्व आत्मसात् करून घेतल्या. यापुढें लोककल्याणार्थ व गूढविद्या संशोधनार्थ न्यायरत्न पूर्णतया सिध्दहस्त झाले. चालू काळास अनुसरून न्यायरत्नांनी प्रचलित सर्व चळवळीत व आंदोलनात आपला वाटा क्रियाशीलतेने उचलला होता.

' नहि कस्तुरिकामोदः शपथेन विधायते ' या उक्तीप्रमाणे न्यायरत्नांच्या ज्ञान कस्तुरीचा सुगंध यथाक्रम दरवळू लागला, व ते महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारताचे एक श्रेष्ठ व उच्चतम पद धारण करणारे मंत्राचार्य आणि तंत्राचार्य गणले जाऊ लागले. ज्याप्रमाणे त्यानी आपल्या शास्त्रार्थ भारतभर प्रवास केला, त्याचप्रमाणे अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप खंडात इतकेच नव्हे तर उत्तर ध्रुवाकडील प्रदेशातही त्यानी प्रवास केला होता. मंत्रतंत्र विद्येचे त्यांचें ज्ञान अति अगाध होते. अमेरिकेतील विख्यात वैज्ञानिक डॉ. फायफर यांचे बरोबर त्याचप्रमाणे आइन्स्टाइन, जॉन ड्युइ, यांच्या सारख्या तत्त्ववेत्त्यांशाही त्यांचा घनिष्ट संबंध होता. डॉ. फायफर यांनी तर स्वतःच्या प्रयोग शाळेत न्यायरत्नांच्या मंत्र-तंत्र विद्येचे सामर्थ्य कांही प्रयोग करून आजमाविले होते. न्यायरत्न आपल्या मंत्र-तंत्राकरितां समिधा, यज्ञोपवीत, तांब्याचे पत्रे, काळ्या मनुका, बदाम, शेंगदाणे, मध, तूप, हळकुंड, वगैरे रोजच्या व्यवहारांतीलच गोष्टींचा उपयोग करीत असत. हे मला अनुभवानें माहित आहे. मी स्वतः माझे कुटुंब व अन्य असंख्य परिचित मंडळी वरील गोष्टींचे अनुभव आज आपल्या दैनंदिन जीवनांत घेत आहेत.

न्यायरत्नांनी धर्मविषयक अगर तंत्रमंत्र विषयक असे स्वतंत्र लेखन केलेले नाही. त्यांचे बरेचसे लेखन, प्रस्तावना, पुरस्कार आशीर्वाद, अभिप्राय, ओळख अशा स्वरूपातच विपुलतने विखुरलेले आहे. जगद्गुरु श्रीशंकराचार्य ( त्र्यबंकशास्त्री खरे ) यांच्या 'मंत्रशास्त्र' या मौलिक ग्रंथास लिहिलेली प्रस्तावना म्हणजेच मंत्र - तंत्र शास्त्राची थोडक्यात संपूर्ण माहिती देणारी एक स्वतंत्र पुस्तिकाच होईल इतकी ही प्रस्तावना अद्वितीय आहे. ( दुर्देवाने नुकत्याच श्री गो. प्र. भावे यानी पुनर्रचित केलेल्या व सौ. जोशी यानीं प्रकाशित केलेल्या मंत्रशास्त्राच्या नव्या आवृत्तींत ती प्रस्तावना घेतलेली नाही, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. इतर हजारो प्रस्तावना घेतल्या असतांही न्यायरत्नांच्या मूळ प्रस्तावनेशिवाय हा ग्रंथ म्हणजे " जीवनाशिवाय श्रीफळ " असेच म्हणावे लागेल, असे आमचे स्पष्ट मत आहे. संपादक आम्हास क्षमा करोत. ) न्यायरत्नांच्या अध्यात्मानुभवाचे निवेदन करणारा स्वतंत्र ग्रंथ म्हणजे 'धवलगिरी' हा होय. या ग्रंथांत न्यायरत्नांनीं अध्यात्ममार्गातील साधकांस उपयुक्त होणारे आपले अनुभव, प्रत्यक्ष साक्षात्कारांची वर्णने, हीं सांगितलेलीं आहेत. या ग्रंथाचे एक आवर्तन झाल्यावर पुढील ज्ञानाकरितां व अध्यात्म मार्गातील कुतूहला करिता दुसरे आवर्तन करावे अशी वाचकांस यंत्रवत् जिज्ञासा होते. या ग्रंथांतील पाउले म्हणजे धवलगिरीवर, मोक्षगिरीवर पोहोचण्याची सोपानपरंपराच आहे, असे म्हणणेच योग्य होईल.

अनाहतनादाने भरलेल्या या विश्वात गान-शक्ति ही सुप्त भावाने असतेच. पुण्यात्म्यांच्या ठिकाणी तीच शक्ति काव्यरूपाने प्रकट होते हे आरंभींच सांगितले आहे. न्यायरत्नांनीही आपल्या विद्यार्थी दशेपासून अभंग रचनाही विपुल प्रमाणात केली आहे. आजपर्यंत ही काव्यसंपदा प्रच्छन्न होती. ती न्यायरत्नांचे एक स्नेही प्रा. प्र. रा. दामले यांनी जुलै १९६८ मध्ये प्रकाशात आणली. अनंतता ( विश्वांतील गूढता ), शूद्रता ( समाजांतील उच्चनीचता ), दीनता ( सामाजिक स्तर ) यावर या कविरत्नाची रचना आहे. परदुःख जाणणारे ते संत म्हणजेच " जो पीड पराई जाणे " याच धर्तीवर ' जिथे जिथे निघे मंद करुण श्वास, तिथे माझा वास असो देवा ' या स्वरूपाचे आर्त कवीने आळविले आहे.

तसेच यापेक्षाही विसंवादित्वाचा म्हणजे जगापासून दूर ब्रह्माप्रत जाण्याचा ' अहं ब्रह्मास्मि ' असाहि एक सूर कवीने आळविला आहे. निवडक काव्यसंग्रह ' अभंगसंहिता ' या नांवाने प्रकाशित झाला आहे.

वर उल्लेख केलेल्या मंत्रशास्त्रासंबंधी तिबेटात सर्व प्रथम जी यंत्र-मंत्र-तंत्र शास्त्रवेत्यांची परिषद भरली होती तिचे न्यायरत्न विनोद हे सभापति होते. एका राष्ट्रीय युवकास त्यावेळी त्याकाळी मिळालेला अत्युच्च्य सन्मान घेता. न्यायरत्न विनोदांच्या वाट्यांला याप्रमाणे अनेक मान-सन्मान आले. त्याना १९५१ साली लंडनच्या ' रॉयल सोसायटी ऑफ आर्टस् ' या संस्थेने आपले सभासदत्त्व बहाल केले होते, तर १९५४ साली टोकिओ येथील ' विश्वशांति ' परिषदेत त्यांना ' विश्वशांति सचिव ' ही बहुमानाचा पदवी अर्पण केली गेली. अमेरिकेतील विश्वधर्म संस्थेचे ते कांही वर्षे उपाध्यक्ष होते.

आजच्या धर्माची हेटाळणी होत असलेल्या काळात व निधर्मीपणाच्या बुरख्यात वावरणाऱ्या धर्मलंडपणाच्या वातावरणात न्यायरत्नांसारखा एक प्रखर धर्माभिमानी धर्मद्रष्टा आमच्या महाराष्ट्रात होता ही आम्हाला एक अत्यंत पराकोटीच्या अभिमानाची गोष्ट आहे. हा प्रष्टा सर्व थरांतील, सर्व देशांतील व सर्वधर्मांच्या मानवांची सेवा करणारा, भले इच्छिणारा कल्याणकारी मार्गदर्शन करणारा असा ध्रुवतारा होता. त्याची परमेश्वरास नित्य प्रार्थना असे कीं " जीविताचे व्हावे लहानसे फूल पूजिण्या पाऊल तुझे देवा !" असे हे जीवित, ईश्वराचें पाऊल पूजिण्या करिता दि. १४ जुलै १९६९ रोजीं लुप्त झालें. त्यास आमचे कोटि-कोटि प्रणाम !

# संतांचा प्रसाद

—-- विनोबाजी भावे

याती हीन, मज काय तोअ भिमान ।
मानी तुज जन नारायणा ॥ १ ॥
काय सुख मज तयाची हे खंती ।
आपुलाला घेती गुण भाव ॥ २ ॥
द्रव्यामुळें माथा वाहियेली चिंधी ।
होन जयामधीं होता गांठी ॥ ३ ॥
तुका म्हणे जन वंदितो वेगळा ।
मजसी दुर्बळा काय चाड ॥ ४ ॥

मी पडलों हीन जातीचा. मला यांत अभिमान बाळगण्यासारखें काय आहे? लोक मला मान देतात, म्हणजे काय 'मला' मान देतात? मी तुमचा भक्त आहें अशा समजुतीनें मान देतात. हा तुमचाच मान झाला. 'मला हे केवढा मान देतात' असें वाटून सुखांत पडण्याचेंहि कांहीं कारण नाहीं. आणि मला हे कां उगाच मान देतात, अशा कल्पनेनें विव्हळ बनण्याचेंहि कारण नाहीं. जो तो आपल्या मनाचा कांहीं तरी गुण कल्पून घेऊन त्या कल्पित गुणाला मान देत आहे; म्हणजे पर्यायानें जो तो आपला गुणच प्रगट करीत आहे. त्यांत माझा काय संबंध निमित्तापुरता आहे. चिंधींत होन बांधलेला असल्यामुळे कोणीं चिंधी गांठीला बांधली तो काय चिंधीचा मान कीं आंतल्या होनाचा? तुकाराम महाराज म्हणतात, लोक मला दुर्बळाला मान देतात असे मी मानतच नाहीं. ज्याला ते मान देतात तो माझ्याहून वेगळाच आहे! मी कशाला तें आपल्याकडे ओढून घेऊ?

तुकाराम महाराजांना जसा निंदकांचा त्रास झाला तसा पूजकांचाहि

बराच त्रास झाला होता. हा 'भगत' मंडळीचा त्रास त्यांना विशेष असह्य वाटत होता.

कोठें देवा आलें अंगा थोरपण ।
बरें होतें दीन होतों तरी ॥ १ ॥
न पुसतें कोणी कोठेंहि असतां ।
समाधान चित्ताचिया सुखें ॥ २ ॥

उगीच मोठेपणा अंगाला चिकटला आहे. नाहीं तर कोणी पुसायला आलें नसतें आणि मनाचा आनंद भोगायला सांपडला असता.

'लाज वाटे मज मानिती हे लोक ।
हें तों नाहीं एक माझे अंगीं ॥ १ ॥
मोजुनी झिजलों मापाच्रिया परी ।
जाळावी हे थोरी लाभाविण ॥ २ ॥'
'पूज्य झालों अंगा आला अभिमान ।
पुढील कारण खोळंबलें ॥ ३ ॥

पूज्यता अंगीं आल्यामुळें (१) उपाधि वाढते, (२) चित्ताची शांति ढळते, (३) अभिमान वाटूं लागतो आणि मग (४) सारीच प्रगति खुंटते. त्याशिवाय लोक जितका गौरव करतात त्या मानानें स्वतःपाशीं कांहींच नसतें. म्हणजे ह्यानें दंभाचा प्रचार होतो. त्यापेक्षां मेलेलें बरें असेंहि एका अभंगांत म्हटलें आहे.

लोक म्हणती मज देव । हा तो अधर्म-उपाव ॥ १ ॥
आतां कळेल तें करीं । सीस तुझे हातीं सुरी ॥ २ ॥
अधिकार नाहीं । पूजा करिती तैसी कांहीं ॥ ३ ॥
मन जाणे पापा । तुका म्हणे माय-बापा ॥ ४ ॥

शेवटीं पूजकांच्या ह्या त्रासांतून कायमची मुक्ति महाराजांनीं शोधून काढली. त्याने समाधान झाले.

लोक मान देतात त्याचें पृथक्करण करून त्यांनीं असे ठरविलें : हा मान माझ्या ईश्वराविषयींच्या खऱ्या अथवा कल्पित भक्तीचा आहे. चिंधीला अभिमान तरी कशाला, आणि खंती तरी कशाला ? म्हणजे चाललेला सर्व सन्मान

ईश्वराचा आहे. शिवाय निंदक ज्याप्रमाणें मनःकल्पित दोष माझ्यांत कल्पून माझी निंदा करतात, ती निंदा मी माझ्याकडे घेत नाही, कारण ती त्यांच्याच मानसिक कुभावनेची निंदा होते; तसेच पूजक मनःकल्पित गुणांबद्दल माझी स्तुति करीत असले तरी ती स्तुति मी माझ्याकडे घेण्याची जरूर नाहीं, कारण ती त्यांच्याच सद्भावनेची स्तुति आहे.

असें पृथक्करण करून महाराजांनीं स्तुति - विष पचविलें.

निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥ १ ॥
मज हेंहि नाहीं तेंही नाहीं । वेगळा दोहींपासूनि ॥ २ ॥
देह - मोग भोगें घडे । जें जें जोडे तें बरें ॥ ३ ॥
अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुकयाचें ॥ ४ ॥

**अवघ्या वाटा झाल्या क्षीण । कळी न घडे साधन ॥**
**उचित विधि-विधान । न कळे न घडे सर्वथा ॥ १ ॥**

**भक्तिपंथ बहु सोपा । पुण्या नागवे या पापा ॥**
**येणें जाणें खेपा । येणेंचि एकें खंडती ॥ २ ॥**

**उभारूनि बाहे । विठो पालवीत आहे ॥**
**दासा मीचि साहे । मुखें बोले आपुल्या ॥ ३ ॥**

**भाविक विश्वासी । पार उतरले त्यांसी ।**
**तुका म्हणे नासी । कुतर्क्यांचे कपाळीं ॥ ४ ॥**

कलियुगांत ईश्वरप्राप्तीचे इतर सर्व मार्ग नाहीसे झाले त्यामुळे आहेत. साधन होऊं शकत नाहीं. कर्ममार्ग हा त्यांतल्या त्यांत सोपा म्हणावयाचा. पण तोहि कलियुगांत कठिण होऊन बसला आहे. कारण कर्माचा योग्य विधि काय हे आधीं समजत नाही. आणि समजलें तरी हातून त्याप्रमाणें वागणें घडत नाहीं. म्हणून भक्तिमार्ग हाच सोपा मार्ग उरला आहे. ह्या मार्गाला पाप किंवा पुण्य बाधूं शकत नाही. ह्याच्या एकट्याच्या मदतीनें येणें - जाणें खुंटतें. हा सोपा म्हणण्याचें कारण, विठ्ठल आपण होऊन बाहू उभारून भक्तांना बोलावीत आहे. आपल्या मुखाने त्याने प्रतिज्ञा केली आहे. कीं 'माझ्या दासांना मीच तारून साहाय्य करण्यास हजर आहे.' जे भाविक ह्यावर विश्वास राखतात त्यांना त्याने पलिकडच्या तीरावर पोंचविलें आहे.

तुकाराम महाराज म्हणतात; नसते तर्क चालविणाऱ्याच्या कपाळीं मात्र नाश ठेवलेला आहे.

( १ ) अवघ्या वाटा झाल्या क्षीण—

‘ कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा । ,
‘ यावीण आणिक असतां साधन ।
वाहतसें आण विठोबाची ॥’

( २ ) विधि-विधान कळत नाहीं—

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः । –गीता.

( ३ ) कळले तरी घडत नाहीं—

ऐसी चिंता करीं सदा सर्वकाळ ।
रात्रंदिवस हेचि तळमळ ॥
तुका म्हणे नाहीं आपुलें बळ ।
जेणें फळ पावेन निश्चयेंसीं ॥

( ४ ) भक्ति-पंथ बहु सोपा

तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनि ।
शाहणा तो धणी घेतो येथें ॥

( ५ ) पाप-पुण्याचा बाध नाहीं.—

यत् करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत् तपस्यसि कौन्तेय तत् कुरुष्व मदर्पणम् ॥
शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्म बन्धनैः ।— गीता

अर्थ :– जें जें कांहीं करशील तें मला अर्पण कर, म्हणजे शुभाशुभांतून सुटलास.

( ६ ) येरझारा नाहींत—

मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते । — गीता.

( ७ ) विठो पालवीत आहे—

दोन्ही हात ठेवुनी कटी । उभा भींवरेच्या तटीं ॥
कष्टलासि साठीं । भक्तिकाजें विठ्ठला ॥ १ ॥
भागलासी मायबापा । बहु श्रम, केल्या खेपा ॥

(८) 'दासा मीचि साहे' असें आपल्या मुखानें, म्हणजे गीतेंत, अनेक वार सांगितलें आहे :—

'योगाक्षेमं वहाम्यहम् ।'
'न मे भक्तः प्रणश्यति ।'
'ददामि बुद्धियोगं तम् ।'
'तेषामहं समुद्धर्ता ।'
'मत्प्रसादात् तरिष्यसि ।'
'अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।'

(९) भाव पाहिजे, तर्क नको --

'तार्किकांचा टाका संग ।
पांडुरंग स्मरा रे ॥'
'नैषा तर्केण मतिरपनेया ।' —श्रुति

# त्या भगवन्मूर्ति आहेत

## विनोबा

मला एका रोग्यांचा प्रथम परिचय झाला १९३६ साली, ज्यावेळी मनोहरजी येथें (दत्तपुर) बसले आणि त्यांनी कुष्ठरोगीसेवेचें काम सुरू केलें. तसें त्यापूर्वी रस्यावर वगैरे मी असे रोगी बघितले होते, पण संस्थेंत त्यांचे चेहरे पहाण्याचा प्रथम योग आला. त्यानंतर दोन वर्षांनी, १९३८ साली मी येथें (पवनारला) आलो. ह्या ठिकाणी खोदत असतांना कांही मूर्ति सांपडल्या. एक मूर्ति तर माझ्या हातालाहि लागली. त्या सगळ्या मूर्ति १३००–१४०० वर्षांच्या जुन्या आणि त्यांचे चेहरे हुबेहुब कुष्ठरोग्यांसारखे. १४०० वर्षें मातींत पडल्यामुळे कुणाचे नाक खरचटले आहे तर कुणाच्या हाताला कांही झाले आहे. जेव्हां-जेव्हां मी महारोगी पहातो, तेव्हां

मला ह्या मूर्तींचे स्मरण होतें. त्या भगवन्मूर्तीच वाटतात. आणि आज जर कोणी नवीन मूर्ति छान, सुंदर बनविल्या तर त्यांच्याविषयीं इतकी भक्ति वाटणार नाहीं, जितकी जमिनीतून निघालेल्या ह्या मूर्तींबद्दल वाटते. मला ह्या सेवेबद्दल अत्यंत आदर आहे. आणि महारोग्यांच्या दर्शनांत मला परंधामच्या ह्या मूर्तींचे दर्शन होते.

जो सेवक सेवा करील त्याच्या ठिकाणीं ही भावना पाहिजे कीं मी निमित्तमात्र आहे. आणि हे रोगी साक्षात् भगवन्मूर्ती आहेत. माझी सेवा घेण्यासाठी कुष्ठरोग्याच्या रूपाने भगवंत अवतरला आहे. मागे एकदां कुष्ठधामांत गेलो होतो आणि सांगितले होते कीं मी ह्या लोकांबरोबर कांही काम करीन. त्यांच्याबरोबर शेतांत पेरणी वगैरेचे थोडा वेळ काम केले. त्यावेळी मला जो आनंद झाला, त्याचे वर्णन शब्दांत करणे शक्य नाही, इतका आनंद मला झाला. आमच्या सेवेने त्यांचा रोग काय बरा होईल, भगवान जाणे! पण त्यांच्या सेवेमुळें आमचा उद्धार होईल, ही पक्की गोष्ट आहे. तेव्हां अशा ह्या आत्मोद्धाराच्या भावनेनें सेवा करावी. आणि अशी सेवा करणारी माणसें सुदैवाने आमच्यांत झाली आहेत. बाबा आमटे समोर बसले आहेत. डॉ. पटवर्धनहि आहेत. ही मंडळी काया-वाचा-मनाने सेवा करीत आहेत. तन्मय आहेत सेवेत. त्या सेवेने आपण कोणावर उपकार करीत आहोंत, असें ते मानत नाहीत; आपल्यावरच उपकार होत आहेत असें मानतात. अशी काही माणसें आमच्यांत निर्माण झाली, ही भगवंताची भारतावर कृपा आहे.

**अद्वैताबरोबर सेवा**—ह्यापूर्वी अशी माणसे केवळ ख्रिस्ती लोकांतच निर्माण झाली होती. त्याचे कारण जीझस ख्राइस्ट. जीझस ख्राइस्टच्या हस्तस्पर्शाने अनेक कुष्ठरोगी उद्धरले, अशी कहाणी बायबलमध्यें आहे. तेव्हां मिशनरी लोक कुष्ठरोग्यांची सेवा भगवत्सेवा आहे असे समजतात आणि ख्रिस्ताची सेवा आहे असेहि समजतात. म्हणून त्यांची ती सेवा अत्यंत तन्मयतेने होते. आपण कांही समजत नव्हतो. आतां समजायला लागलो आहोत.

मौज अशी आहे की, आपल्या येथे तत्त्वज्ञानाला तुटवडा नाहीं. फार मोठे तत्त्वज्ञान भारतात निघाले— अद्वैत. आतां अद्वैतापेक्षां जास्त पुढे कोण जाणार? इतके असूनही आपल्या वर्तनात भेदभाव राहिला. आश्चर्य वाटते की; कसा राहिला! तेव्हां ख्रिस्ती धर्मातील सेवावृत्ति आणि हिंदु धर्मातलें अद्वैत ह्या दोहोंचा जोड बसला तर अत्यंत आनंदमय वातावरण निर्माण होईल भारतांत.

हे ओळखलें प्रथम स्वामी विवेकानंदांनी. विवेकानंद शांकर संप्रदायाचे म्हणजे अद्वैत विचाराचे. आणि त्या विचाराबरोबर त्यांनी ख्रिस्ती लोकांची सेवावृत्ति उचलली. मी जागोजागीं पाहिले, रामकृष्ण मिशनने उत्तम सेवाकार्य चालविलें आहे. अद्वैताला सेवेची जोड ही जी नवीन भूमिका आली ती अप्रतिम भूमिका आहे आणि त्यांत हिंदुधर्म आणि ख्रिस्ती धर्म ह्याच्या सर्वोत्तम शिकवणीचा समवाय होतो. अशा

रीतीने भिन्न भिन्न धर्मातला उत्तम-उत्तम अंश घेऊन आम्हांला परिपूर्ण धर्म बनवायचा आहे. त्या दृष्टीने स्वामी विवेकानंदांनी हें फार उत्तम कार्य केलें.

प्रश्न असा आहे कीं हे जे कुष्ठरोगी आहेत, तसे दुसरेही दुःखी आहेत. अनेक लंगडे, आंधळे आहेत. आणि सर्वांचीच सेवा करण्याची गरज आहे. असा एक फारच मोठा सेव्य वर्ग उत्पन्न होतो. असा हा अत्यंत दुःखी, पीडित सेव्य वर्ग ज्यांना साक्षात् सेवेची अत्यंत गरज आहे; आणि सेवेशिवाय त्यांना दुसरा आधार नाही, निराधार आहेत- विचारांत घेतला, तर तो किती मोठा होईल ? भारताची लोकसंख्या ५५ कोटी आहे, तेव्हां ५५ लाख तरी असे लोक असतील. वेदांत प्रार्थना केली आहे– "अंधः ख्यत्, निःश्रोणो भूत् – हे भगवंता ! जो लंगडा आहे, तो चालणारा होवो, आंधळा आहे त्याला दर्शन होवो, दिसो. अर्थात् सामान्य आपल्याला जें दिसतें, तेंच त्याला दिसो, अशी त्या वेदाच्या ऋषींची अपेक्षा नाहीं. त्यांची अपेक्षा उलटी आहे. त्याला परमात्म-दर्शन होवो, अशी त्यांची अपेक्षा आहे. आतां हें जेव्हां होईल तेव्हां होईल, पण त्या आधीं सामान्य जें व्हावयाचें दर्शन ते झालें तरी पुष्कळ लाभ होईल. सूरदासाचे एक सुंदर भजन आहे कीं, काय ही परमेश्वराची लीला आहे ! भलते-सलते काही करावे, असाच त्याला नाद आहे ! **ऊधो, करमन की गति न्यारी** । मोठे - मोठे डोळस लोक आहेत, त्यांना परमात्म-दर्शनाची लालसा नाहीं, आणि सूरदास जो आंधळा, त्याला भगवत्-दर्शनाची लालसा ठेवलीस ! काय-काय विपरीत तूं करतोस ! –**मूरख मूरख राजा कीन्हो, पंडित फिरत भिखारी** । आणि शेवटीं त्यानें म्हटलें–**सूर श्याम मिलन की आशा, छिन छिन बीतत भारी** । तर वेदाच्या काळापासून सूरदासाच्या काळापर्यंत, आंधळे-पांगळे ह्यांची सेवा करणें म्हणजे भगवंताची सेवा करणें अशी ही फार मोठी भावना आपल्यांत चालू आहे, पण प्रत्यक्षांत अंमलात आलेली नव्हती. ती खिस्ती लोकांनी अंमलात आणली.

असें असते कीं ज्या ज्या धर्मात गुरु असतो त्याची विशेषता त्या-त्या धर्मात येते. जैन उपवासबहाद्दर आहेत. उपवास करावा तर जैनांनीच. कारण जैनाचा मुख्य महावीर ह्याने आपल्या जीवनात अर्ध्याहून अधिक उपवासच केले ! म्हणजे जितके दिवस खाल्ले त्याहून अधिक दिवस उपवासच झाले. आणि उपवास म्हणजे बिन पाण्याचा उपवास. मध्यंतरी सत्याग्रहाची गोष्ट चालली होती आणि त्यांत उपवासाची गोष्ट निघाली. तेव्हां मीं म्हटलें कीं जैनांनीं उपवास करूं नये, कारण जैन उपवास करतील तर लोक म्हणतील कीं हे तर धर्माचेच काम झाले, हा कांही सत्याग्रह होणार नाहीं. सारांश सद्गुरूंची विशेषता त्यांच्या अनुयायांत येते. जैनांमध्ये जशी ही उपवासाची परंपरा तशी खिस्ती लोकांत ही सेवेची विशेषता आली.

**"ग्रामे ग्रामे सभा कार्या"** आतां ह्या सगळया सेव्यवर्गाला आपण

सगळयांनीं मिळून कसें काय आटोपायचें ? कसें काय काम होणार ? ह्याचें उत्तर माझ्या मनात हेंच आहे कीं—

**ग्रामे ग्रामे सभा कार्या ग्रामे ग्रामे शुभा कथा**

हा श्लोक पंडित मदन मोहन मालवीयांचा आहे. मी त्यांना भेटायला गेलों होतों, तेव्हां त्यांनी मला ऐकवला होता. प्रत्येक गांवात शुभा कथा व्हायला पाहिजे आणि प्रत्येक गांवात सभा असली पाहिजे. ह्या रोग्यासंबंधीची योजना ग्रामसभेनें हातांत घेतली पाहिजे. त्यांचे रिहॅबिलिटेशन करायचें काम ग्रामसभेनेंच हातांत घेतलें पाहिजे. जोंपर्यंत हें होत नाहीं आणि आपण ग्रामसभेला कर्तृत्व देत नाहीं, वरून-वरून आम्हीच सर्व कामें करीत आहोंत तोंपर्यंत हें काम होणार नाही. आपल्या मराठींत म्हणतात, उंटावरून शेळया हांकणारा ! शेळया हांकण्यासाठीं खालीं उतरावे लागतें जमिनीवर. उंटावर बसलेला आपले आसन सोडणार नाही, तर शेळया कशा हांकणार ? तसें आपण उंच आपल्या जागीं बसून कामें करू, तर काम कसें होणार ? साक्षात् जी ग्रामसभा तिनेंच तें काम हातांत घेतलें पाहिजे, आणि रोग्यांचे पुनर्वसन व्हायला पाहिजे. आणि जी कांही माहिती द्यायची ती शिक्षक आदीच्या द्वारें गांवां-गांवांत दिली गेली पाहिजे. अशा प्रकारें अखंड ज्ञान-प्रचार झाला पाहिजे. आणि ही जी विनाकारण धास्ती असते ती गेली पाहिजे. माणूस रोगानें मरतो त्यापेक्षां भीतीनें अधिक मरतो.

भीति सर्वात मोठा ' महा रोग ' आहे. तो हा भय आहे. नाना रोग भीतीमुळे जडतात. 'मला असे झाले असेल' अशी कल्पना मनांत आली कीं होतोच रोग पोटांत. हें जे भयकार्य आहे, त्याचे निवारण झाले पाहिजे. म्हणून गीतेंत देखील दैवी संपत्तीची सुरवात ' अभयम् ' पासून केली आहे. विनाकारण त्या रोग्यांनी आणि समाजानें भ्यावें, हें बरोबर नाहीं.म्हणजे वास्तविक जितकें भ्यायला पाहिजे तितके भीतच नाहीत. अस्वच्छतेला भीतच नाहीत ती कायमच ठेवली आहे. विनाकारण, ज्याला भ्यायला नको त्याला भितात. तेव्हां हें काम ग्रामसभेनेंच करायला पाहिजे. जें पत्रक प्रसिद्ध केलें आहे, महाराष्ट्र सरकारनें, त्यांत सांगितलें आहे की चाळीस हजार गावांपैकी पाऊणपट गांवात ह्या कामाची माहिति पोचविली गेली आहे आणि इंजेक्शन्स देण्याची सोय केली आहे. हें ठीकच आहे की इंजेक्शन्सची सोय आहे, पण प्रत्यक्ष ग्रामसभेनेच हा कार्यक्रम अंगीकारला आहे, असे झाले पाहिजे. ह्याचा अर्थ असा होतो की गांवाची जबाबदारी उचलणारी ग्रामसभा झाली पाहिजे. म्हणजे गांवागांवात ग्रामस्वराज्य झालें पाहिजे. ग्रामस्वराज्याशिवाय हें काम होणार नाहीं.

———

**Books published and sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित
## व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ५-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | — |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ५-२५ |
| (५) | ,, | (Karnad) | N. S. Anantha Raum | ६-०० |
| (६) | A Glimpse of Indian Spirituality by Pradhan | | | १-५० |
| (७) | A Glimpse of Indian Spirituality (Telugu) | | | १-०० |
| (८) | श्रीसाईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-७५ |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. थोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपीत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्रीरुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | शीलधी | (मराठी) | डॉ. मन्द्राणकर | ००-७५ |
| (१५) | श्रीसाईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१६) | Guide to Shirdi (English) | | | ००-१२ |
| (१७) | स्तवनमंजिरी व सुमनांजलि | (मराठी) | | ००-२० |

श्री. पी. वी. पळन नार्ही.

Commission to Sellers [illegible] except on 2 to 10 for which only 25 P. and 50 P. for No. 1. Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   **P. O. Shirdi., Dist. Ahmednagar.**

2. **Sai Baba Office 'Sai Niketan,'**
   **Dr. Ambedkar Road, 804 B, Dadar, Bombay 14.**